त्यानंतर काकांनीं शिरडी कोठें आहे वगैरे माहिती घेऊन दर्शनास जाण्याचें कबूल केलें आणि पुढें दर्शनहि घेतलें. याविषयीं काकांची विस्तृत चरित्रासह हकीगत पुढें योग्य प्रसंगीं देण्यांत येईल.

(३) **बाबांचें बाळ** (श्री. बा. वि. देव सेवानिवृत्त मामलेदार–ठाणें) नानासाहेबांची व यांची १९१० सालीं गांठ पडली. यांना नानासाहेबांनीं प्रत्यक्ष अनुभवाच्या अति गोड, सुरस व बोधप्रद अशा बाबांच्या कथा व लीला सांगितल्या. त्यानंतर श्री. देव शिरडीस जाऊन बाबांचें दर्शन घेऊन कृतार्थ झाले इत्यादि साविस्तर हकीगत त्यांनीं साईलीला वर्ष २, अंक ६ यांत दिलेली आहे. आणि नानासाहेबांनीं त्यांना सांगितलेले अनुभव अनेक अंकांत प्रसिद्ध केलेले आहेत. वर्ष १६ अंक १,२,३ यांत त्यांनीं नानासाहेबांचें संक्षिप्त चरित्र दिलेलें आहे. या सर्व अंकांचा हा लेख लिहिण्याचें कामीं बराच उपयोग झाला आहे आणि त्याबद्दल मी श्री. देव मामलेदार यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

(४) श्री. तात्यासाहेब नूलकर—हे १९०९ सालीं पंढरपुरास मुनसफ होते. आणि नाना तेथेंच मामलेदार होते. दोघांच्या वरचेवर गांठी पडत असत आणि संभाषण होत असे. तात्यासाहेबांचा संतावर विश्वास नसे, तर नानासाहेब पक्के संतप्रेमी. नानासाहेब त्यांना नेहमीं बाबाच्या गोष्टी–लीला सांगत व शिरडीस केव्हां निघतां असें टुमणें त्यांच्यामागें लावीत असत. शेवटीं तात्यासाहेब शिरडीस जाण्यास कबूल झाले, पण तें दोन अटींवर. (१) त्यांना ब्राह्मण स्वयंपाकी हवा होता आणि (२) उत्तम नागपुरी संत्रीं बरोबर न्यावयास हवीं होती. या दोन्ही अटी अकल्पित रीतीनें पूर्ण झाल्या. एक ब्राह्मण नोकरीसाठीं नानासाहेबाकडे आला, तो त्यांनीं तात्यासाहेबांकडे पाठविला. तसेंच पंढरपुरांत उत्तम संत्रीं मिळत नव्हतीं. पण दुसरे दिवशीं प्रातःकाळीं त्यांचें एक मोठें पार्सल आलेलें मिळालें. तें उघडून पहातात तों, त्यांत उत्तम शंभर संत्रीं ! अशा रीतीनें अटी पुऱ्या झाल्यावर ते नानासाहेबांबरोबर शिरडीस गेले. आणि बाबाचें दर्शन घेते झाले. बाबा प्रथम त्यांचेवर रागावले, पण लगेच त्यांनीं त्यांचेवर कृपा करून त्यांना असे उत्तम

---

## कै. पंडित मोतीलालजींचा दुसऱ्याच्या 'चष्म्यांतून पहाण्यास नकार

ब्रिटिश अमदानींतील असेंब्लींत स्वराज्य पक्ष ह्या विरोधी पक्षाचे कै. मोतीलालजी पक्षप्रमुख होते. एकदां पंडितजी चष्मा आणण्यास विसरले असतां एका युरोपियन एक्झिक्युटिव्ह कौन्सिलरनें आपला चष्मा पुढें केला. हजरजबाबी पंडितजी तत्काळ म्हणाले, "माफ करा, मी आपल्या चष्म्यानें (दृष्टीनें) पाहूं शकत नाहीं."

दुसऱ्याच्या चष्म्यानें (दृष्टीनें) पहाणें सदोष आहे. सबब दूरदृष्टि ठेवून निर्दोष चष्म्यासाठीं भेटा.

**शेंडे आणि कंपनी, चष्म्याचे व्यापारी,** बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४.

अनुभव प्राप्त करून दिले कीं, बाबा हे देवाधिदेव आहेत अशी त्यांची खात्री झाली. शेवटीं ते तेथेंच रमले व त्यांनीं आपला देह शिरडीसच ठेविला. अंतकालीं त्यांना बाबांचें चरणतीर्थ मध्यरात्रींस मिळून त्यांना उत्तम गति प्राप्त झाली. त्यांच्या निधनाची वार्ता कळतांच बाबा तेथें गेले आणि म्हणाले कीं— 'अरे, तात्यांनीं आघाडी मारली. त्यानें आपल्या जन्माचें सार्थक केलें.'

५ **हेमाडपंत** (श्री. अण्णासाहेब दाभोळकर) नानासाहेबांनीं यांना शिरडीस बाबांच्या दर्शनास जाण्यास कसें प्रवृत्त केलें या विषयीं श्रीसाईलीला मासिक आणि श्रीसाईसच्चरित्रांत वर्णन आलेलें आहे याविषयीं श्रीसाईलीला, वर्ष १३, अंक ४, ५, ६ यांत पान १६ वर 'नाना' या शब्दावर श्री सुमनसुंदर यांनीं मार्मिक व सुंदर विवेचन केलें आहे. तें असें:— नाना हा नाहीं नाहीं म्हणजे 'नेति नेति' याचा अपभ्रंशहि होऊं शकेल व **विवेक** हेंच कार्य करतो; सत् असत् यांतील भेद विशद करून विवेक 'सत' चें अद्वैत पटवितो. 'भासतें तसें नसतें' हें त्याचें संकलित कार्य होय. मायेचा फोलपणा दाखवून तो परमात्म्याची खरी जाणीव करून देतो. नानाची भूमिका अशीच आहे.

'केव्हां निघणार साई दर्शना ।
किमर्थ आळस शिरडी–गमना ॥
दीर्घसूत्रता कां प्रस्थाना ।
निश्चिंती मना कां नाहीं ?' ॥

—श्री साईसच्चरित २'११९

हें (नानाचें वचन) त्याचेंच द्योतक आहे. विवेक मनाला अशीच टोंचणी देऊन मोक्षाकडे खेंचतो:—साई परमात्म्याच्या दर्शनास केव्हां निघणार ? शिरडी परब्रह्म गमनास–आत्मज्ञानरूप मोक्ष मिळवण्यास आळस व मनाची चलबिचलता हीं उपयोगी नाहींत. आळस, मनाचें चांचल्य हे मायेचे विकार आहेत, ज्याला आत्मज्ञान हवें असेल, त्यानें त्यांचा त्याग केला पाहिजे. विकारी वृत्ति सोडून विचारी बनलें पाहिजे, असा त्याचा भावार्थ आहे. आणि हेमाडपंताच्या मिषानें आपणा सर्वांस विवेकानें (नानानें) जागें केलें आहे व आत्मोन्मुख बनविलें आहे.

**(६) श्री दासगणू महाराज** (श्री. गणपतराव सहस्रबुद्धे) हे नानाच्या वेळीं नगर येथें पोलीस खात्यांत कारकून होते. त्यांना कविता विशेषतः लावण्या करण्याचा फार नाद होता. नानासाहेबांनीं त्यांचें मन वळवून कीर्तनें करून बाबाची प्रसिद्धि करण्याकडे प्रवृत्त केलें. त्यांचे घरी दामुआण्णा आठवले म्हणून एक गोड आवाजाचा मुलगा होता. त्याला त्यांनीं कीर्तनांत साथीदार म्हणून श्री दासगणूकडे दिलें. या जोडीमुळें कीर्तनास रंग चढून बाबांची प्रसिद्धी मुंबईच्या आजुबाजूस बरीच झाली. आणि तेथून बाबांच्या दर्शनास लोक भराभर जाऊं लागले आणि लवकरच शिरडी हें क्षेत्र बनलें. याचें श्रेय नानासाहेबांस आहे.

**आधुनिक नानासाहेब** (श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी अय्यर). अलीकडे गेल्या १८।२० वर्षांत नानासाहेबांची ही कामगिरी मद्रासचे श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी अय्यर यांनीं मोठ्या उत्साहानें चालविली. त्यांनीं अनेक साईभक्तांच्या भेटी घेतल्या आणि त्यांचे अनुभव लिहून

घेऊन प्रसिद्ध केले. श्री बाबाविषयीं बरेच ग्रंथ प्रसिद्ध केले आणि 'साई सुधा' नांवाचें मासिक १७।१८ वर्षें चालविलें, आणि तें अद्याप चालू आहे. त्यांनीं हिंदुस्थानदेशभर दौरे काढून बाबांविषयीं व्याख्यानें दिलीं आणि ठिकठिकाणीं संम्मेलनें (परिषदा) भरविलीं; अशा रितीनें बाबांची निरपेक्षपणें सेवा करून ते बाबांच्या चरणकमलीं कांहीं महिन्यापूर्वी विलीन झाले. श्री बाबांचा यशोदुंदुभि हिंदुस्थानभर पसरलेला आहेच आणि तो आतां हिंदुस्तानबाहेरहि अखिल जगतांत पसरण्याकरितां आणखी कोणी नूतन नानासाहेब बाबा उत्पन्न करतील अशी आशा आहे.

आतां नानासाहेबांचें संक्षिप्त चरित्र देऊन त्यांत आलेले कांहीं अनुभव देतों

**चरित्र**—नानासाहेबांचा जन्म ठाणें येथें १८६० सालीं झाला. त्यांचे वडिलाचें नांव गोविंदपंत नाना उर्फ नानासाहेब. ते डेप्युटी कलेक्टर व कलेक्टरचे पर्सनल असिस्टंट होते. त्यांना दसरदार ही पदवी मिळाली होती. कल्याणास त्यांचे वाड्यास दसरदारांचा वाडा असें म्हणतात. ते सुशील व सदाचारी होते आणि त्यांचा दानधर्म बराच असे. त्यांना ठाणें जिल्ह्यांतील भिवंडी तालुक्यांतील कवाड क्षेत्र-निवासी श्री सखाराममहाराज यांचा अनुग्रह मिळाला होता. हे सखाराम-महाराज आणि श्री बाबा गुरुबंधु होते. असें सांगतात. नानांचें मराठी शिक्षण कल्याण येथें आणि पुढील इंग्रजी शिक्षण मुंबईच्या एलफिन्स्टन हायस्कुलांत व एलफिन्स्टन कॉलेजांत झालें. ते १८८३ सालीं बी. ए. झाले. संस्कृत हा त्यांचा ऐच्छिक व आवडीचा विषय होता आणि तो त्यांनीं आमरणांत कायम ठेविला. त्यांचा विवाह १८७८ सालीं कल्याण येथें पनवेल तालुक्यांतील पळस्पे गांवच्या विनायक सदाशिव उर्फ काकासाहेब ओझे या श्रीमान गृहस्थाच्या कन्येशीं झाला. त्यांच्या पत्नी सौ. राधाबाई यांचेपासून त्यांना दोन पुत्र व दोन कन्या झाल्या. थोरले चिरंजीव वासुदेव उर्फ बाबुराव हे ग्रॅजुएट असोन विलेंपारलें येथील खासगी हायस्कुलांत गणित शिक्षक होते. धाकटे चिरंजीव महादेव उर्फ बापुराव हे शेतकी शिक्षण घेऊन घरींच शेतीभाती करीत असत. वासुदेवरावांचा विवाह ग्वाल्हेरचे सुप्रसिद्ध जहागिरदार श्री. रामराव कृष्ण जठार यांची कन्या इंदिराबाई यांचेशीं झालेला आहे; आहे आणि बापुरावांचा विवाह धारवाडचे वकील श्री. त्रिविक्रम काशिनाथ पित्रे यांच्या गिरिजाबाई नामक कन्येशीं झालेला आहे. वडील कन्या मैनाताई यांना पुण्यास कुवळेकर यांचे घरीं, आणि कनिष्ठ कन्या द्वारकाबाई यांना सातारचे पेंढरकर यांचे घरीं दिली होती.

नानासाहेब बी. ए. झाल्यावर त्यांची प्रथम नेमणूक संगमनेर येथें मामलेदार कचेरींत कारकुनाचे जागीं झाली. नंतर त्यांना नगर जिल्ह्यांत कोपरगांव येथें अव्वल कारकुनाची जागा मिळाली. १८९२ सालीं ते नगर येथें कलेक्टर साहेबांचे चिटणीस झाले (ह्याच वेळीं त्यांना बाबांचें दर्शन झालें.) १८९३ सालीं पुणें जिल्ह्यांत घोडनदी तालुक्याचे मामलेदाराची जागा त्यांना मिळाली. पुढें १८९४ ते १९०१ पर्यंत ते पुनः

नगर जिल्ह्याच्या कलेक्टरचे चिटणीस होते. सन १९०२ सालापासून ते खानदेशांत जामनेर तालुक्याचे मामलतदार होते. (त्यावेळीं त्यांना बाबानीं आपली अलौकिक शक्ति दाखवून त्यांच्या मुलीची सौ. मैनाताईची प्रसूति–सुटका केली.) नंतर त्यांची बदली नंदुरबार, पंढरपूर वगैरे ठिकाणीं मामलतदार म्हणून झाली. सन १९०८ सालीं ते पुणें येथें डि. डे. कलेक्टर झाले. १९०९ सालीं याच जागेवर त्यांची बदली ठाण्यास झाली. इ. स. १९१५ सालीं ते सेवानिवृत्त झाले. त्यानंतर सहा वर्षांनीं म्हणजे १९२१ सालीं त्यांनीं आपला नश्वर देह श्री बाबांचे चरणीं ठेविला.

**बाबांचें प्रथम दर्शन** (श्री साईलीला वर्ष ३ अंक ३) नानासाहेब नगर जिल्ह्यांत कलेक्टरचे चिटणीस असतांना शिरडीचे आप्पा कुलकर्णी नगरास जमाबंदीच्या कामाकरितां बाबांची आज्ञा घेऊन निघाले. कलेक्टरचे चिटणीस कोण आहेत याची चौकशी करून, बाबांनीं तुला बोलाविलें आहे असा निरोप आप्पा कुलकर्ण्यांमार्फत त्यांनीं नानास पाठविला. आपण येत नाहीं असा नानानीं जबाब दिला. पुनः बाबानीं तोच निरोप अप्पा कुलकर्ण्यांमार्फत पाठविला. पुनः नानाचा नकार आला. असें दोनतीन वेळां झाल्यावर अखेर नानांनीं भेटीस येण्याचें कबूल केले. पण त्यांचे मनांत शंका–कुशंकांचें काहूर ऊठलें. आपण एखाद्या फकिराच्या भेटीस जाणार कीं खऱ्या संताच्या भेटीस जाणार याचा त्यांचे मनांत निश्चय होईना. शेवटीं आपल्या पत्नीकडून गाठोड्यांत बांधून ठेविलेला एक जुना अल्पाकचा कोट मागून घेऊन तो घालून ते बाबांच्या दर्शनास गेले. रिक्तहस्तें साधुसंताच्या दर्शनास जाऊं नये, तशांत शिरडी हे खेडेगांव असल्यामुळें तेथें कांहींच मिळणार नाहीं अशा विवंचनेंत ते असतां त्यांचा हात सहज त्या कोटाच्या खिशांत गेला. त्यांत त्याना एक लहानशी पुडी मिळाली. ती उघडून पहातां त्यांत २।४ बदाम व २।४ खडीसाखरेचे तुकडे मिळाले. याचें नानासाहेबांस सकौतुक आश्चर्य वाटलें. आपण रिक्तहस्तें बाबाकडे जात नाहीं, बाबा हे साधु असावेत असें त्यांना वाटून ते बाबांकडे गेले आणि त्यांना साष्टांग प्रणिपात करून समोर बसले आणि आपणास कां बोलाविलें असें विचारलें. अरे, जगांत काय थोडीं माणसें आहेत, त्यांना न बोलावितां तुलाच कां बोलावतों याचें कांहीं तरी कारण असेलच कीं नाहीं असें बाबांनीं उत्तर दिलें. त्यावर नाना म्हणाले–तें कारण सांगा. बाबा म्हणाले—तुझा व माझा चार जन्मांचा संबंध आहे, तुला तो माहीत नाहीं, मला माहीत आहे म्हणूनच तुला मी बोलावितों. सवडीप्रमाणें पुनः येथें येत जा. त्यावर नाना म्हणाले–बरें आहे, येत जाईन.

**प्लेगची लस टोंचून घेणें**— (श्रीसाईलीला वर्ष ३, अंक ३) इतकें झालें तरी नानासाहेबांचा बाबांवर विश्वास बसेना. पुढें कांहीं दिवसांनीं नगरच्या आजूबाजूस प्लेगची सांथ सुरू झाली. त्यावेळीं कलेक्टरसाहेबांनीं नानासाहेबाला सांगितलें कीं, तुम्हीं प्रथम प्लेगची लस टोंचून घेऊन उदाहरण घालून द्या, म्हणजे इतर सर्व लोक तुमचें अनुकरण

करतील. नानासाहेब फार पेचांत पडले. त्यावेळीं लसीचा तोडगा प्रयोगावस्थेंत आणि धोक्याचा होता अशी सर्वांची समजूत. तेव्हां आतां काय करावें हें त्यांना सुचेना. विचार करितां करितां त्यांना एक युक्ति सुचली. याविषयीं बाबांना विचारून त्यांचें मत घ्यावें आणि ते सांगतील तसें करावें. विचार करणेसाठीं म्हणून त्यांनीं कलेक्टरसाहेबाकडून एक आठवड्याची मुदत मागून घेतली आणि त्या मुदतींत एक दिवस शिरडीस येऊन सर्व हकीकत बाबांना निवेदन केली आणि विचारलें कीं, प्लेगची लस टोंचून घ्यावी कीं घेऊं नये. बाबा म्हणाले—अंः, त्यांत काय आहे, टोंचून घे, भिऊं नको, त्यापासून कांहीं वाईट होणार नाहीं. त्यानंतर नानासाहेब परत नगरास आले आणि टोंचून घेण्याचें आपण ठरविले आहे असें कलेक्टरसाहेबांना सांगून त्यांनीं टोंचून घेतलें. पुढें त्यांचें आफिसांतील सर्व मंडळींनीहि टोंचून घेतलें. टोंचून घेतलें त्यापैकीं कोणावरहि वाईट परिणाम झाला नाहीं. त्यामुळें नानासाहेबांची बाबांवरील श्रद्धा जडत चालली आणि बाबांत कांहीं विशेष तेज आहे, आणि त्यांचेकडे आपण वरचेवर जावें असें त्यांना वाटूं लागलें.

**हरिश्चंद्र डोंगर ट्रीप** (श्री साईलीला वर्ष ३, अंक ३) नानासाहेब नगर जिल्ह्यांत चिटणीस असतांना एकदां हरिश्चंद्र डोंगरावर जाण्याचा त्यांनीं बेत ठरविला. त्यांचे आफिसांतील मंडळीस हा बेत कळवितांच, बाबा खरवंडीकर नामक आफिसांतील माहितगार विनयशील, स्पष्टवक्ते कारकुनानें स्पष्ट सांगितलें कीं, उन्हाचे दिवस, वाट उंच व अवघड, वाटेंत पाण्याचा थेंबहि मिळणार नाहीं, करितां तूर्त हा बेत रहित करावा. नानासाहेबांना हें म्हणणें पटलें नाहीं. तेव्हां सर्वांनीं डोंगरावर जाण्याची तयारी केली आणि पर्वत चढण्यास आरंभ केला. अर्धा रस्ता चढल्यावर नानासाहेब थकले आणि तहानेनें व्याकुळ झाले आणि बाबा खरवंडीकराना म्हणाले की, कसेंहि करा, मला पाणी पिण्यास द्या, त्याशिवाय मला पुढें पाऊल टाकवत नाहीं. खरवंडीकर म्हणाले कीं मी आपणास पूर्वीच बजाविलें होतें, आतां आपण अर्धी वाट आलों, येथें पाण्याचा माग मूस नाहीं आणि कोणी वाटाड्याहि दिसत नाहीं तेव्हां पाणी मिळावें कसें ? यानें नानासाहेबांचें कांहीं समाधान झालें नाहीं. पुढें मार्ग आक्रमण करण्यास किंवा मागें परतण्यासहि ते तयार होईनात. या स्थितींत त्यांनीं बाबांचें स्मरण केलें आणि त्यांचा धांवा केला. इतक्यांत त्या वाटेनें एक भिल्ल डोक्यावर लांकडाची मोळी घेऊन जातांना त्यांचे दृष्टीस पडला. नानासाहेबानीं सहज त्याला, येथें जवळपास पिण्यास पाणी मिळेल काय असें विचारलें. तुम्हीं बसलां त्या दगडाखालींच पाणी आहे असें सांगून तो भिल्ल आपल्या वाटेनें निघून गेला. नंतर मंडळीनीं दगड वर उचलून पाहिलें तों काय चमत्कार सांगावा ! त्यांची तहान भागण्यापुरतें स्वच्छ मधुर पाणी त्यांना मिळालें. नानासाहेब तें पाणी प्याले आणि शांत झाले. सर्व मंडळीना हा मोठा चमत्कार वाटला. भिल्लाचा तपास करतां तो कोठें दिसेना; तेव्हां नाना म्हणाले पहा, माझे बाबा कसे आहेत. त्यांनीं मला येथेंच बसल्या जागीं

पाणी दिलें कीं नाहीं? बाबांवरील नानासाहेबांची निष्ठा पाहून, बाबा जरी शिरडींत असले तरी, ते सर्वव्यापी, भक्त-वत्सल असून भक्तांचीं संकटें दूर करितात अशी सर्व मंडळीची खात्री झाली. नंतर सर्व मंडळी हरिश्चंद्र पर्वताचे माथ्यावर जाऊन सायंकाळीं परत नगरास आली.

इकडे शिरडीस त्याच वेळीं बाबा मशीदींत बोलूं लागले कीं काय करावें, नानाचा जीव कासावीस झाला, ऊन फार झालें, पाण्याबगर नाना थकला, त्याला पाणी थोडें तरी दिलेंच पाहिजे. तेथें जमलेल्या मंडळींना या भाषणाचा कांहीं उलगडा होईना. पण कांहीं अनुभविक भक्तांनां मात्र वाटलें की, नानावर कांहीं संकट आलें असावें, पुढें कांहीं दिवसांनीं नाना शिरडीस दर्शनास आल्यावेळीं बाबांनीं विचारलें कीं, कां नाना, पाणी मिळालें का? हें ऐकून नाना सद्‌गदित झाले आणि त्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. ते म्हणाले आपल्या सारखी गुरुमाय सुदैवानें लाभली असतां पाणी कां मिळणार नाहीं? हा प्रकार पाहून त्या दिवशीं बाबा नानाविषयीं तसें कां बोलत होते याचें कोडें उलगडलें आणि बाबाच्या लीलेचें सर्वांना आनंद व कौतुक वाटलें.

**पद्मालय ट्रीप व गडवाभर चहा**

(श्रीसाईलीला व. ७ ३।४) दुसरी अशीच एक ट्रीप नानासाहेबानीं केली. पूर्व खानदेशांत पाचोऱ्यापासून ८–१० मैलांवर पद्मालय म्हणून एक रम्य स्थान आहे. तेथें एका गोविंदबुवानीं एक सुंदर गणपतीचें मंदिर बांधलें असून त्यावर शंभर तोळे सोन्याचा कळस चढविलेला आहे. नानासाहेब खानदेशांत दुसऱ्या एका तालुक्याचे मामलेदार होते पद्मालयाला जाण्याचा त्यांनीं बेत ठरविला आणि पाचोऱ्याहून पद्मालयापर्यंत वाहनाची व्यवस्था करणेबद्दल पाचोऱ्याच्या मामलेदाराला कळविलें. त्यांनीं त्याप्रमाणें टांग्याची व्यवस्था केली. ठरलेल्या दिवशीं व वेळीं नानासाहेब आपल्या गांवाहून निघाले. त्यावेळीं त्यांची गाडी चुकली. यामुळें पाचोऱ्यास नानासाहेब आणि मंडळी दुपारी पोंचावयाची ती सायंकाळीं पोंचली. तेव्हां समजलें कीं, टांगेवाला मंडळीची वाट पाहून ती न आल्यामुळें परत गेला. तेव्हां पायीं जाण्याखेरीज दुसरें साधनच नसल्यामुळें सर्व मंडळी चालूं लागली. पद्मालयास जाणेचा रस्ता चांगला नसून जंगलांतील आडरस्ता होता. तसेंच इतके ८–१० मैल चालण्याची नानांना संवय नव्हती. तेव्हां ती वाट चालतांना त्यांना फार त्रास झाला. दुसरी एक अडचण अशी उत्पन्न झाली कीं, गोविंदबुवा दिवसभर देवळांत राहून पूजाअर्चा करून येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यांची जेवणाखाण्याची सोय करीत असत आणि रात्रौ दहा वाजल्यावर देवालयापासून कांहीं अंतरावर असलेल्या आपल्या मठींत विश्रांतीसाठीं जात असत. दहानंतर थकून भागून ही मंडळी पद्मालयीं पोंचणार आणि तेव्हां त्यांची जेवणाखाण्याची सोय कशी होणार ह्याची त्या मंडळींना मोठी काळजी वाटली. चालतां चालतां नानासाहेब बरेच थकले. थोडा वेळ चालावें आणि मध्येंच विश्रांती-साठीं उभें राहावें, बसावें असा क्रम चालला. मध्येंच एके ठिकाणीं त्यांनीं बाबांचा धांवा केला कीं, बाबा मला आतां जेवणखाण न मिळालें तरी

चालेल पण एक गडवाभर चहा मिळेल तर काम भागेल. पण चहाची वर्दी गोविंदबुवाला कोण पोंचविणार हें त्यांना मोठे कोडें पडलें. शेवटीं बाबांवर सर्व भार घालून सर्व मंडळी दहा वाजल्यानंतर पद्मालयीं पोंचली. मंदिराशीं येतात न येतात तोंच गोविंदबुवा हातांत चहाची चरवी घेऊन ऊभे. 'नाना आलास काय' असें म्हणून त्यांनीं नानाचें स्वागत केलें. नाना म्हणाले, महाराज, आपण यावेळीं येथें कसे? तेव्हां गोविंदबुवा म्हणाले– "अरे नाना फार लांबून पायीं चालत येत असल्यामुळें तो अतिशय थकला आहे, त्याला फार भूक लागली आहे, त्याचेकरतां एक मोठा तांब्याभर चहा तयार करून ठेव' असा आतांच बाबांकडून बिनतारी संदेश आला आहे. म्हणून मी तुझे करितां चहा घेऊन आलों आहें.' अहाहा, काय हे बाबांचें अंतरसाक्षित्व आणि भक्तांविषयीं कळकळ!

सर्व मंडळीनीं ह्या चहाचा प्रसाद प्रेमादरपूर्वक घेतला. नंतर रात्रीं तेथें विश्रांति घेऊन दुसरे दिवशीं भोजनप्रसाद घेऊन मंडळीं आपल्या गांवीं परतली.

**बोधेगांव ट्रीप–श्री बन्नुमाईचें दर्शन**— (श्रीसाईलीला वर्ष ७, अंक ७–१०) नगर जिल्ह्यांत बोधेगांव म्हणून एक खेडेगांव आहे. तेथें **बन्नुमाई** नांवाची एक यवन जातीची महासाध्वी महाविरक्त, ज्ञानी, मोठ्या अधिकाराची कुमारिका रहात होता. ती बहुतेक गांवाबाहेर, जंगलांत झाडाझुडपांत रहात असे. तिला कोणी शोधावयास अगर भेटावयास गेल्यास ती निवडुंगाच्या झुडपांतून वाऱ्यासारखी धांवत असे. त्यावेळीं तिच्या अंगांत पुष्कळ कांटे बोचत असत तरी तिला त्याची दाद नसे. गांवांत घरीं तिची आई एकटीच असे, तिला भेटण्यासाठीं ती क्वचित् केव्हां तरी येई. ती वेडी आहे असे गांवचे लोक


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

**बॉम्बे सिल्व्हर शॉप**

टेलिफोन ३८८६२

शुद्ध चांदीचा हरेक तऱ्हेचा माल बनविण्याचें व ऑर्डरप्रमाणें माल करून देण्याचें विश्वासलायक ठिकाण. त्याचप्रमाणें सोन्याचाही माल ऑर्डरप्रमाणें करून देण्यांत येतो. एकदां भेट देण्याची तसदी घेऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.

**बा. गो. जुवेकर**

मालक

गिरगांव, मांगलवाडी,
श्री धूतपापेश्वर प्रासाद, मुंबई नं. ४



॥ विमलेश्वर प्रसन्न ॥

**भा. रा. रेवणकर सराफ**

ठळकवाडी (बेळगांव)

**सोन्या–चांदीच्या तयार दागिन्यांचे व्यापारी**

आमचेकडे खडे मोत्यांचे सेटिंग्जचे आधुनिक पद्धतीचे दागिने, लफ्फे, तन्मणी, नेकलेस इअरींग्ज वगैरे तयार होतात.

बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांचे ऑर्डरीकडे विशेष लक्ष दिलें जातें.

समजत असत. अशा या साध्वीचें दर्शन घ्यावें अशी नानासाहेबांना प्रबल लालसा झाली, पण हें दर्शन बहुतेक अशक्य आहे असें त्यांना वाटलें, तरी त्यांची दर्शनेच्छा कमी होईना. बाबांच्या कानावर ही गोष्ट घालावी आणि ते सांगतील तसें करावें असें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें सवडीनुसार बाबांची भेट झाल्यावर नानासाहेबांनीं आपली दर्शनेच्छा व त्या मार्गांत येणाऱ्या अडचणी बाबांना सांगितल्या. बाबा म्हणाले—'तुला आतां कोणाचें दर्शन कशास घ्यावयास पाहिजे ? येथें सर्व कांहीं नाहीं का ?' या उत्तरानें नानासाहेबांची समजूत होईना व ते आपला आग्रह धरूनच बसले. तेव्हां 'दर्शन होईल जा' असे बाबांनीं सांगितलें. तेव्हां तेथून परत आल्यावर बोधे गांवास जाण्याची तयारी करण्यास आपले सल्लागार बाबा खरवंडीकर यास सांगितलें. पाट, रांगोळीचे सामान, लुगडें स्नानाचें सामान, कुंकुम, मंगलसूत्र इत्यादि सामान घेऊन बाबा खरवंडेकरासहित नानासाहेब बोधे गांवास आले आणि तेथील एका देवळांत उतरले तेथें तपास करतां बन्नुमाई गांवांत नसून बाहेर जंगलांत आहे असें समजलें. तिचा शोध घेतघेत नानासाहेब गांवाबाहेर येऊन कांटेरी अरण्यांत धांवू लागले. बराच वेळ झाला तरी दर्शन नाहीं. नानासाहेब थकले, थोडेसे निराश झाले, आणि त्यांनीं बाबांचें स्मरण केलें, आणि मनांत म्हणाले कीं, दर्शन व्हावयाचें नव्हतें तर, 'दर्शन होईल जा' असें मला कां सांगितलें ? दर्शन झाल्याशिवाय मी येथून हालणार नाहीं. असें म्हणून डोळे उघडतात तों, बन्नुमाई नग्नावस्थेंत नानासाहेबांच्या पुढें उभ्या. त्यांना फार आनंद झाला. त्यांनीं तिला वंदन करून तिचे अंगांत शिरलेले कांटे काढण्यास सुरुवात केली; तोंच त्या वाऱ्याप्रमाणें गर्द निवडुंगांत पसार झाल्या. तेव्हां नानासाहेब खिन्न झाले, पण निराश झाले नाहींत. त्यांनीं खरवंडेकरास सांगितलें कीं, येथेंच राहुटी ठोका, कनाती लावा, पाणी तापवा, राहुटीचे आंत पाट मांडून भोंवतीं रांगोळया काढा, स्नानाची सर्व तयारी ठेवा. खरवंडेकरांनीं सर्व तयारी यथासांग करणेस सुरुवात केली तों त्यांत एक चोळी कमी आहे असें दिसून आलें. इतक्यांत त्या गांवचा बाजार आटपून एक शिंपी घोड्यावरून परत आपल्या गांवीं जात होता. त्यांचेपाशीं चोळीहि मिळून सर्व तयारी पुरी झाली. तेव्हां नानासाहेबांनीं क्षणभर डोळे मिटून बाबांचें स्मरण केलें आणि त्यांची करुणा भाकली. तेव्हां काय चमत्कार सांगावा ! डोळे उघडून पहातात तों, बन्नुभाई राहुटीं मांडलेल्या पाटावर स्नानाकरितां उभ्या. तेव्हां नानासाहेबांना अत्यानंद होऊन त्यांनीं प्रथम तिच्या अंगांतील कांटे काढले, सौगंधिक तेल व उटणें लाविलें आणि तिला अभ्यंग स्नान घातलें. नंतर तिचें अंग स्वच्छ पुसून तिची वेणी घातली. कंठांत सोन्याचें मंगलसूत्र बांधिलें, कुंकुम लावून लुगडें नेसविलें आणि चोळीहि अंगांत घातली. नंतर तिची पूजा करून हातावर नैवेद्य ठेवून तिला वंदन केलें व दक्षिणा दिली. इतकें होतें न होतें तोंच बन्नुमाईनीं सर्व पदार्थांचा त्याग करून "दिशोऽपि वसनं" धारण करून जंगलांत वायुवेगानें प्रयाण केलें, लगेच

ही बातमी गांवांत पसरली. आणि बन्नुमाईची वृद्ध आई तेथें धांवत आली आणि तिनें नानासाहेबांवर बालिश आरोप करून त्यांना शिव्या देण्यास सुरुवात केली. नानासाहेबांनीं शांत मनानें तिची विनवणी केली आणि खरी वस्तुस्थिती सांगितली; तरी तिचें समाधान होईना. शेवटीं तेथें पडलेलें सर्व सामान ( लेकीच्या पूजेचें ) घेऊन जाण्यास जेव्हां तिला सांगण्यांत आलें तेव्हां तिचा कोप थंड झाला आणि तें सर्व सामान घेऊन ती घरीं परतली. नंतर नानासाहेब देवळांत आपल्या मुक्कामीं परत आले आणि सायंकाळचा फराळ होऊन सर्व मंडळीसहित तेथें निजले व पहांटेस परत जाण्याचे वेळीं फिरून बन्नुमाईचें दर्शन कसें होईल या विचारांत ते अंथरुणावर पहुडले. त्या रात्रीं बन्नुमाई आपल्या मातोश्रीकडे निजावयास आल्या. पहांटे ४|५ वाजतां नानासाहेब जागे होऊन पाहातात तों, बन्नुमाई आपल्या उशापाशीं बसलेल्या त्यांना आढळल्या. हें पाहून त्यांना बाबांच्या लीलेचें परम कौतुक वाटून त्यांना परमाश्चर्य व परमानंद झाला. त्यांनीं त्यावेळीं पुन्हां बन्नूमाईच्या पायांवर डोकें ठेवून वंदन केलें; इतकें होतांच बन्नूमाई लगेच तेथून पसार झाल्या. बन्नूमाईची आईहि तिच्या शोधार्थ आली, तेव्हां झालेला प्रकार तिला समजला. बन्नूमाईची आई म्हणून नानासाहेबांनीं तिचीहि द्रव्यदानानें संभावना केली आणि तीहि शांत व प्रसन्न अंतःकरणानें घरीं गेली, आणि नानासाहेबहि सर्व मंडळीसहित परत नगरास आले.

## 'जामनेरचा अद्भुत चमत्कार

( श्रीसाईसच्चरित्र अ ३३ )

## 'तूं घालिसी उडी भक्तांचे संकटीं'

—श्रीकृष्ण भटजी बोदकर महाराज

जामनेरास नानासाहेब मामलेदार असतांना त्यांनीं आपली आसन्नप्रसव मुलगी सौ. मैनाताई प्रसूतीसाठीं आपले घरीं आणली. पूर्ण दिवस भरल्यावर भयंकर प्रसूतिवेदना सुरू झाल्या. सुईणी व वैद्य हे सर्व थकले. कोणाचें कांहीं चालेना. तेव्हां या संकटाचें निरसनार्थ नवचंडी हवन, सप्तशतीपठण इत्यादि धार्मिक विधि करण्यांत आले, तरी पण लवकर सुखानें सुटका होईना. यावेळीं जर बाबांची उदी मिळेल तर माझें कार्य होईल असें नानासाहेबांना वाटून त्यांनीं बाबांचा धांवा केला. इकडे शिरडीस खानदेशचे रामगीरबुवा (त्यांना बाबा प्रेमानें बापूगीर म्हणून हांक मारीत असत) यांना आपल्या घरीं जावें असा त्यांच्या मनाचा उठाव झाला आणि ते बाबांची अनुज्ञा व उदी मागण्यास मशिदींत आले. सर्वसाक्षी सर्वशक्ति बाबा त्याला म्हणाले, 'तूं खुशाल आपल्या घरीं जा, पण वाटेंत थोडा विसावा घे, प्रथम जामनेरास जाऊन नानाच्या घरीं उतर आणि त्याचा क्षेमसमाचार घेऊन तूं आपला मार्ग धर.' पुनः शामा ( माधवराव देशपांडे ) याचेकडे वळून बाबा म्हणाले—शामा, ती माधव अडकराची आरती ( 'आरती साईबाबा, सौख्य दातार जीवा' इत्यादि ) कागदावर उतरून काढ आणि ती बापुगीर गोसाव्याच्या हातीं दे. नंतर बाबांनीं अनुज्ञा व उदी दिली. आणखी थोडी उदी दुसऱ्या पुडींत बांधून सांगितलें कीं, ही उदीची पुडी आणि आरती जामनेरास नानाच्या हातीं दे आणि त्याचा क्षेमसमाचार घेऊन पुढें तूं आपल्या घरीं जा.

बापुगीरानें उत्तर दिलें कीं—बाबा, माझे‧ कडे अवघे दोन रुपये आहेत, तेव्हां मी जामनेरास कसा जाऊं शकेन? बाबा म्हणाले, 'तूं स्वस्थ मनानें जा, तुझी सर्व कांहीं सोय होईल.' याप्रमाणें बाबांची अनुज्ञा व उदी घेऊन, बाबांवर पूर्ण विश्वास ठेवून बापुगीर प्रवासाला निघाला. हल्लीं जसा जामनेरास आगगाडीचा मार्ग आहे तसा त्यावेळीं नव्हता. जळगांवास उतरून दुसऱ्या वाहनानें जामनेरास जावें लागे. बापुगीरानें एक रुपया चौदा आणे देऊन जळगांवचें तिकिट काढलें. खिशांत अवघे दोन आणे शिल्लक राहिले. गाडी रात्रीं जळगांवला आली. बापुगीर प्लाट‧फार्मवर उतरले. आणि आतां पुढें कसें करावें या चिंतेंत पडले. इतक्यांत 'शिरडीचा बापुगीर कोण आहे का' असा आवाज त्याच्या कानीं पडला. मीच तो म्हणून बापुगीर पुढें झाला. त्याला "शिपाई दिसला मोठा चतुर। दाढी मिशा कल्लेदार। नीट नेटस ल्यालेला इजार। तांगा सुंदर देखिला॥" (श्रीसाईसच्चरित अ. ३३-९४) बापुगीर तांग्यांत जाऊन बसले. तांगा व घोडे इतराप्रमाणें भाड्याचे नसल्यानें इतर तांग्यांच्या पुढें जोरानें धावूं लागले. जळगांव ते जामनेर—अठरा कोसांचें अंतर भराभर तोडीत हा तांगा पहांटेच्या सुमारास एका मोठ्या ओढ्या समीप आला. तेथें घोड्यांना पाणी पाजण्यासाठीं तांगा सोडला, आणि त्या शिपायानें स्वतः थोडें पाणी आणून फराळ (आंबे, पेढे, गुळपापडी वगैरे) बापुगीराच्या पुढें ठेवून तो सेवन करण्यास विनंति केली. त्याचा पेहेराव पाहून हा मुसलमान असावा, त्याच्या हातचा फराळ कसा खावा, अशी शंका बापुगीराच्या मनांत आली आणि तो थोडें काकूं करूं लागला. त्याच्या मनांतील शंका जाणून शिपाई त्याला म्हणाला—आपण मनांत शंका धरूं नका. मी हिंदु, गरवाल क्षत्रिय रजपूत आहे. नानानीं हा फराळ पाठविला आहे, स्वस्थ चित्तानं तो सेवन करा. या उत्तरानें बापुगीराच्या मनांतील शंका दूर झाली आणि नंतर दोघांनीं मिळून फराळ केला आणि पुनः तांग्यांत बसून ते निघाले, तों अरुणोदयीं जामनेरासमीप आले. नानाची मामलेदाराची कचेरीहि दिसूं लागली. घोडे थोडेसे थांबले. बापुगीरहि लघुशंकेसाठीं तांग्यांतून खालीं उतरून एका बाजूस बसले. लघुशंका आटपून परत येऊन पाहतात तों,

नाहीं तांगा, नाहीं घोडीं।
दिसेना तांगेवाला गडी।
कोणीही न दिसे ते घडी।
जागा उघडी देखिली।

—श्री साईसच्चरित. ३३-१०५

हा काय चमत्कार, मला येथपर्यंत आणून हा गडी कुठें गेला असा विचार करीत बापुगीर कचेरींत आला आणि नानासाहेब घरीं आहेत असें कळून त्यांचे घरचा पत्ता काढीत त्यांचें घरीं आला आपण आल्याची वर्दी देतांच नानासाहेबानीं त्यांना आंत बोलाविलें. परस्परांची भेट होतांच बापुगीरानें उदी व आरति त्यांचे समोर ठेवून संपूर्ण हकीकत सांगितली. नानासाहेबाची मुलगी याच वेळीं प्रसूति वेदनांनीं विव्हळ होऊन अडलेली होती. क्षुधार्ताला पंच पक्वानांचे ताट मिळाल्याप्रमाणें नानासाहेबांची स्थिति झाली. त्यांनीं आपल्या कुटुंबाला हाक मारून उदी पाण्यात घालून मुलीला पिण्यास

देण्यास सांगितलें; आणि स्वतः आरति म्हणण्यास लागले.

गुरुरायाची आरती केली।
उदी पाजितां प्रसूती झाली।
बाळा हातीं पायीं सुटली।
झाला आनंदी आनंद ॥

—श्री देवकृत नानासाहेब आख्यान.
ओंवी ५६
श्रीसाईलीला वर्ष १३. अंक ११–१३,
पान ३३

बापुगीरानें नंतर नानासाहेबांना विचारलें—तांगेवाला कुठें गेला, येथेंहि तो मला दिसत नाहीं, आपण धाडलेला तांगा कुठें आहे ? तेव्हां ते म्हणाले—मी तांगा पाठविला नाहीं, कुठला तांगा हें सुद्धां मला माहीत नाहीं, तुम्ही येथें येणार हें कोणाला ठाऊक ? आणि मी तांगा कशाला धाडीन ?

"मग बुवांनीं तांग्याची कथा।
आमूलाग्र कथिली समस्तां ॥
विस्मय दाटला नानाचे चित्ता।
पाहूनि वत्सलता बाबांची ॥११८॥
कुठला तांगा, कुठला शिपाई।
नट नाटकी ही माऊली साई ॥
संकटसमयीं धांवत येई।
भावापायीं भक्तांच्या ॥ ११९ ॥"

—श्रीसाईसच्चरित, अ. ३३.

ही कथा श्रीसाईसच्चरितात अध्याय ३३ मध्यें आलेली आहे. तिचा आधार घेऊन बाबांच्या बाळांनीं (श्री. बाळकृष्ण विश्वनाथ देव यांनीं) श्रीसाईलीला, वर्ष १३ अंक ११–१३, शके १८५८ (सन १९३६) यांत नानासाहेबाख्यान प्रसिद्ध केलें आहे. यांत हा अद्भुत चमत्कार सुंदर गद्यपद रीतीनें वर्णिलेला आहे. हे प्रसिद्ध करणें पूर्वी शिरडींत वस्ती करून राहिलेले रामगीरबुवा यांना प्रत्यक्ष भेटून व विचारून वर्णन केलेली हकीकत खरी असल्याबद्दल खात्री करून घेऊन, तसेंच नानासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव वासुदेव नारायण उर्फ बाबुराव यांचेकडूनहि खात्री करून घेऊन नंतर हें प्रकरण कीर्तनाख्यानरूपानें प्रसिद्ध केलें आहे असें श्री. देव, सदरहु अंक पान १८ येथें लिहतात.

वर नमूद केलेले श्री. बी. व्ही. नरसिंह-स्वामी, यांनीहि या प्रकरणांत चौकशी केली आहे. त्यांनीं श्री. मैनाताई यांची त्यांच्या पुणें येथील निवासस्थानीं भेट घेतली आणि त्यांचा जबाबहि १ जून १९३६ रोजीं लिहून घेतला. याविषयीं त्यांनीं असें सांगितलें आहे कीं, इ. स. १९०५ सालीं जामनेरास माझा प्रसूति समय अगदीं समीप आला होता आणि बऱ्याच जोराच्या वेणा (वेदना) होत होत्या. त्यावेळीं गोसावी उदी घेऊन आले होते हें मला ठाऊक आहे; पण त्यावेळीं माझ्या वेदना (दुःख) असह्य असल्यामुळें मला त्यांची प्रत्यक्ष माहिती नाहीं. (भक्तानुभव, भाग ३ पान १४)

तसेंच त्यांनीं रामगीरबुवा (बापुगीर-बाबा) यांचा ता. १ डिसेंबर १९३६ रोजीं सविस्तर जबाब लिहून घेतला आहे, त्यांनीं या प्रकरणाविषयीं असें सांगितलें आहे कीं, एके दिवशीं बाबांनीं मला बोलाविलें आणि उदीची पुडी आणि आरति दिली. त्यावेळीं मला खानदेशाला जावयाचें होतें. बाबांनीं मला जामनेरला (जामनेर हें भुसावळ

स्टेशनहून गाडीमार्गे ३६ मैल आहे) जा आणि उदी व आरति नानासाहेब चांदोरकर, जामनेरचे डेपुटी कलेक्टर यांना दे म्हणून सांगितलें. मी बाबांना म्हटलें कीं, मजपाशीं अवघे दोन रुपये आहेत आणि तेवढ्या पैशानें आगगाडीनें कोपरगांव ते जळगांवपर्यंत मी कसा जाऊं शकेन ? बाबा म्हणाले–देव सर्व कांहीं देईल (करील). तो दिवस शुक्रवार होता आणि मी ताबडतोब निघालों. मनमाडला मी रात्रीं ७–३० वाजतां आणि जळगांवला पहांटे २–४५ ला पोंचलों. तेथें प्लेगचे नियम (कायदे) चालू असल्यामुळें मला बराच त्रास झाला. जामनेरला कसें जावें या विवंचनेंत मी होतों. इतक्यांत अजमासें ३ वाजतां, बुट, पगडी व इतर चांगला पोषाक यांनीं सजलेला एक प्यून (शिपाई) आला आणि त्यानें मला एका तांग्यापाशीं नेलें आणि ताग्यांत बसवून तो हाकलण्यांत आला. मी मनांत घाबरलों. वाटेंत बघूर येथें मला फराळ देण्यांत आला. पहाटेस आम्हां जामनेरला पोंचलों. आणि मी लघुशंका वगैरे प्रातर्विधि करण्यास गेलों होतों. तेव्हां तांगा आणि तांगेवाला अदृश्य झाले असें दिसलें. (भक्तानुभव भाग ३ पान ८६)

शेवटीं या प्रकरणाच्या उपसंहारार्थ एवढेंच सांगवयाचें कीं–या चमत्काराविषयीं कोणास शंका घेण्यास कांहीं कारण नाहीं. बाबांच्या उदीमुळें हल्लीहि सुखानें प्रसूति झाल्याचा अनुभव आमचे घरीं आलेला आणि इतरांनाहि आलेला आम्हांस माहीत आहे. तेव्हां बाबांनीं स्वतः होऊन पाठविलेल्या उदीचा परिणाम 'अचुक व रामबाण' झाला असलाच पाहिजे यांत संशय नाहीं. पण तांगा, घोडे, शिपाई, फराळ इत्यादि वर वर्णिलेला प्रकार हा बाबांच्या 'कर्तुमन्यथाकर्तुम्, सर्वसाक्षित्वाचा व सर्व शक्तिमत्वाचा' द्योतक आहे आणि यावरून बाबा हे देव–परमात्मा आहेत हें सिद्ध होतें.

आतां नानासाहेबांना आलेले आणखी कांहीं अनुभव आणि मिळालेली शिकवण सांगून हें प्रकरण पुरें करूं. हा भाग पुढील अंकांत देण्यांत येईल.

(अपूर्ण)

---

# भक्ताचे पुरवी मनोरथ हरी—

माझी स्फूर्ति सरस्वती मज म्हण, बाळा कवी विठ्ठला ।
मद्वत्सा श्रमलासि ऐक सखया सांगेन जें मी तुला ॥
झाला ताप शमेल या हरिकथापीयूषपानें तुझा ।
भक्ताचे पुरवी मनोरथ हरी संदेह नाहीं दुजा ॥

—विठ्ठल चित्रकवि

# ऐसा कृपावंत कोण ।
# माझ्या विठाई वांचून ॥

कै. ह. भ. प. पांगारकर यांनी लिहिलेली एक आठवणः—

१९१० सालची गोष्ट. मुमुक्षु सुरू करून चार वर्षें झालीं. अगदींच बस बसेना. चार वर्षांत तीन हजार रुपये कर्ज झालें. पैशाची भयंकर टंचाई झाली. एकदां तीन आठवडे माझ्या जवळ एकच पावली होती. छापखान्याचें बिल ता. ८ ला द्यावेंच लागे ! महिन्यांतून तीन वेळां मुमुक्षु काढावा लागे. त्याचें बिल रु. ५३ होत असे. एकदां ता. ८ उगवली. छपाईवाले रा. सापकर (ज्ञानचक्षूचे मालक) आज दुपारीं दोन वाजतांच येणार, त्यांना पैसे तर देतां येत नाहींतच, पण उत्तर काय द्यायचें ? हा प्रश्न मला खाऊं कां गिळूं करूं लागला. खिशांत अवघी पावली ! दोन वाजले. सापकर आले. या बसा केलें. तीन फेऱ्या घातल्या. उत्तर काय देऊं ? शेजारच्या खोलींत गेलों. दार लावून खुर्चीवर बसलों. टेबलावर डोकें टेकलें. 'तुला सोडून माणसाची नोकरी करायची नाहीं ही माझी मनीषा, देवा ! तूं पूर्ण करणार नाहींस काय ? तुझ्यावांचून मला दुनियेंत कोणताहि आधार नाहीं. धांव पांव सांवळे विठाबाई। कां मनीं धरली अढी ?' अशीं पांच मिनिटें अंतरापासून प्रार्थना केली. डोळे पुसले व बाहेरच्या खोलींत आलों. 'सापकरांना काय उत्तर देऊं ?' बाहेर दारावर थाप. एकजण आंत आला. 'आपण पांगारकर काय ?'

'होय !'

'भक्तिमार्ग प्रदीपाच्या २०० प्रति पाहिजेत.'

कमिशन कापून ३७॥ रुपये होतात. बराच धीर आला. पुन्हां तो म्हणाला,

'आणखी काय पुस्तक आहे ?'

'मोरोपंती वेंचे.'

त्याच्या १५।२० प्रती मागितल्या. बिल बरोबर ५३ रुपये झालें ! सापकरांस ५३ रुपये दिले. मला बोलवेना ! !

हांकेसरिसा उडी ।
घालोनियां स्तंभ फोडी ॥
ऐसा कृपावंत कोण ।
माझ्या विठाईवांचून ॥

हा अनुभव काय एकट्या तुकोबांचा आहे ?




## डिसेंबर १९५६

या महिन्यांत श्रीसाईदर्शनासाठीं दर रोज भक्तांची फार गर्दी होत असे. अनेक कलाकारांनी श्री पुढें हजेरी दिली. त्यांतील कांहीं कार्यक्रम पुढील प्रमाणें:—

**कीर्तनः**—श्री. श्री. बा. उर्फ बाबुराव देव ठाणें. श्री. मराठे गवई यांनीं या महिन्यात दोन कीर्तनें केलीं.

**पोवाडे** श्री. गणपतराव सुर्वे पुणें; श्री. दत्तोबा नाईक, पुणें; श्री. वसंतराव कल्याणपुरकर, पुणें; पोवाड्याचे कार्यक्रम चांगले झाले.

**नकलाः**—श्री. मधुकर काशिनाथ शिगवण, मुंबई.

**फिडलवादनः**—जनार्दन माणिक भोईर, मुलुंड.

**गायनः**—कु. रंजना पेंडसे, अकोल (वऱ्हाड); कु. रत्नमाला दशपुत्रे, भुसावळ; श्री. पंडितराव नगरकर, पुणें; श्री. सुलोचना पालकर, पुणें; श्री. अनंतबुवा ओंकार, पुणें; श्री. रामचंद्र शामराव बोरकर, मुंबई; श्री. माघव विष्णू भांडारकर. इन्दूर; श्री. लक्ष्मणराव गणपतराव देवासकर, मुंबई. श्री. लोकनाथकी अम्मा, मद्रास. श्री. गणेश परशराम ओक, मुंबई कु. हंसा जोशी, ठाणे. कु. मालती वैद्य, मुंबई. श्री. मुळचंद हे बागडी, खामगांव.

**कवाली भजनी मंडळ**

**बडोदाः**—सय्यदभाई कमरुद्दीनभाई बरोडावाला आणि इतर सर्व भजनी मंडळी यानी बडोद्याहून पायी चालत शिर्डीस पांचपंचवीस मंडळीनी येऊन भजन सेवा केली. राजणदेवी प्रासादीक भजनी मंडळी ठाणे. भजन हजेरी दिली, श्रीदत्तजयंती निमित्त श्रीमंदिरात सायंकाळीं श्रीदत्त जन्माचे कीर्तन व रात्रौ श्रींचे पालखीची गांवांतुन मिरवणूक नाताळ सुट्टी निमित्त श्रींचे जुनेकापडांची प्रसाद म्हणून विक्री करणेत आली.

## जानेवारी १९५७

बाहेरगांवच्या भक्तांचीं श्रीसाईचे दर्शनाकरितां नित्याप्रमाणें गर्दी होतीः— कांहीं कार्यक्रमः—

**कीर्तनः**—श्री. बा. ऊर्फ बाबुराव देव, संस्थान गवई मराठे यांचें कीर्तन झालें.

**प्रवचनः**—श्री. वे. शा. सं. पद्मनाथशास्त्री दादर श्री. ह. भ. प. नाथबुवा पंढरपूरकर, पुणें.

**गायनवादनः**—श्री. रामचंद्र निलकंठ राईलकर, मुंबई. श्री. नारायण निळकंठ राईलकर, मुंबई. श्री. देवनाथ, वैद्य, मुंबई श्री. प्रमिला करमरकर, मुंबई. श्री. श्रीकांत मोहिले, सौ. शैला मोहिले, मुंबई. सौ.

कमलाबाई शिंदे, श्री. वसंतराव शिंदे, सांगली. श्री. ठाणेदार, राहता, श्री. कृष्णराव सिद्ध, श्रीगोंदे, श्री. श्रावण-कुमार, धुळें, श्री. रामदास नायडू, सोलापूर, श्री. जगन्नाथबुवा सुरतकर, कु. दत्तात्रय दिगंबर, सोलापूर, श्री. दिगंबरबुवा कुलकर्णी सोलापूर, श्री. मधुकर हटकर, मुंबई, श्री. यशवंत हटकर, मुंबई.

ता. २६ जानेवारी स्वातंत्रदिनानिमित्त दिव्यांची रोषणाई. गायन भजन वगैरे कार्यक्रम श्री मंदिरांत झाला.

## फेब्रुवारी १९५७

या महिन्यांत श्रीसाईदर्शनासाठीं बाहेरगावचे भक्तांची गर्दी नित्याप्रमाणें होती. कांहीं कलावतानी श्रीपुढें हजेरी दिली ती खालील प्रमाणें:—

**कीर्तनः**—ह. भ. प. पोपटबुवा लोहणेरकर, मु. साकोरी, श्री. ह. भ. प. रामचंद्र गणेश ढेपे, जेऊरकर, जि. नगर श्री. द. दा. ऊर्फ नानासाहेब रासने श्री. मराठे, सं. गवई यांची श्रीदास नवमी व दोन एकादशीस कीर्तनें

**प्रवचनः**—श्री. मो. ग. भावे, कल्याण.

**वेदमंत्र हजेरीः**—श्री. वे. मू. सदाशिवभट्ट शुक्ल, त्रिंबकेश्वर, वे. मू. अंबादासभट्ट देवकुळे, त्रिंबकेश्वर.

**तबलावादनः**—श्री. विनायकराव पेंढारकर, मुंबई.

**गायनः**—श्री. गणपतराव देवास्कर मुंबई. श्री. जगन्नाथबुवा सुरतकर, साकोरी श्री. वत्सलाबाई पवार, बार्शी. श्री. पिरोजबाई दस्तुर, मुंबई. श्री. दत्तात्रय नारायण नाडकर्णी, मुंबई. श्री. बाबुराव गणेश मुळे, मुंबई. श्री. माधवराव पोतदार व सौ. कमलाबाई पोतदार, हैद्राबाद. श्री. ज. घों. भानत, चेंबूर.

महाशिवरात्रीनिमित्त श्रींचें पालखीची गांवांतून मिरवणूक निघून रात्रौ कीर्तन गायन वगैरे झालें.

संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्याचा रुग्णाना फायदा मिळत आहे.

शिरडी संस्थान भक्त मंडळाची स्थगित झालेली भक्त मंडळाची सभा दि. १०–३–१९५७ रविवार रोजीं सिद्धार्थ कॉमर्स कॉलेज, फोर्ट, मुंबई येथें भरली होती व त्या सभेंत १९५५ सालचा व्यवस्थापक समितीचा अहवाल व १९५५ सालची अकौन्ट समिती, यांनीं सुधारलेले ताळेबंदी हिशेब व त्याचा अहवाल, सर्वानुमते संमत झालें. अध्यक्ष पी. के. सावंत हे गैरहजर असल्यामुळें श्री. बाळाराम जयकर हे अध्यक्ष स्थानीं होते.

त्या सभेंत हिशेब समिती व आर्किटेक्ट समिती यांचे आभार मानण्यांत आले. त्या समितीच्या सदस्यांना श्रीसाई महावस्त्र प्रसाद द्यावा असें ठरलें. भक्त मंडळाची पुढील सभा जून महिन्यांत होणार आहे.

द. ब. राणे
सी. बी. वेलकर
संयुक्त चिटणीस

---

## भक्तमंडळाचे सभासद

ता. १० फेब्रुवारी १९५७ पर्यंत श्री साईबाबा संस्थानच्या भक्तमंडळाचे जे नवे सभासद झाले त्यांचीं नांवें पुढील प्रमाणें:—

### पेट्रन

(१) श्री. व्ही. जी. केळसकर, आंजलैं
(२) श्री. डी. बी. मालपेकर, मुंबई.

### आजीव सभासद

(१) श्री. एम्. एल्. अमीन, मुंबई
(२) श्री. एस्. के. बक्षी, हैदराबाद (द.)
(३) श्री. टी. आर. देसाई, मुंबई
(४) श्री. आर. एन्. गिरप, मुंबई
(५) श्री. पी. एम्. गवाणकर, पुणें
(६) श्री. आर. जी. कसात, सेलू
(७) श्रीमती मालतीबाई मणेरीकर, मुंबई
(८) श्री. जे. आर. धूत, शेवली
(९) श्री. एम्. जे. जानी
(१०) श्री. एस्. ए. कारकेरा, मुंबई
(११) श्रीमती जसुमती मोदी, मुंबई
(१२) श्रीमती मेना चाचरिया, पाटण
(१३) श्री. एस्. के. पटेल, सुरत
(१४) श्री. व्ही. एम्. पटेल, सारधान
(१५) श्री. पी. टी. राजकोंडावार, वणी
(१६) श्री. आर्. व्ही. श्रॉफ, मुंबई
(१७) श्री. जी. आर्. विदुर, चांदेकासारे
(१८) श्री. एस्. चतर्जी, कलकत्ता
(१९) श्री. एम्. जी. सारडाणा, डेहराडून
(२०) डॉ. श्रीनिवास राव, जग्गयपेठ

### सामान्य सभासद


नवीन सामान्य सभासद मुंबई प्रांतांत ११७ आणि इतर प्रांतांत २८ मिळून १४५ इतकी नवी सभासद-संख्या झाली.

**डी. बी. राणे**
**सी. बी. वेलकर**
संयुक्त चिटणीस

---

दिव्य दृष्टीसाठीं !

## शिसा ऑप्टिशिअन्स



( चष्म्यांचे व्यापारी )

यांच्या येथें डोळ्यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

**छबीलदास रोड, दादर ( W. R. ), मुंबई २८.**



# श्री साईलीला



या अंकांत—


- बाबांची लीला
- शिरडींतील रामनवमी महोत्सव
- संसाराकडून विठ्ठलाकडे
- श्रीसाईगाथामृत
- श्रीदास गणूमहाराज आणि कान्हा भिल्ल
- श्रीसाईबाबांची भूपाळी
- सुश्लोकगीता
- —दे चरणीं थारा
- श्रीज्ञानेश्वर-जीवन
- एका म्हातारीचें महत्कार्य

इ. इ.






# श्री साई लीला


[ शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक ]

वर्ष ३४ वें : अंक २ रा

वार्षिक वर्गणी रु. २-४-० (ट. ख. सह)

एप्रिल—मे—जून १९५७



संपादक—

नागेश आत्माराम सावंत

रामचंद्र महादेव राणे



कार्यालय—

ईस्ट अँण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग,

४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १


## श्री साईवाक्सुधा



★

पाप जयांचें विलया गेलें ।
ऐसे जे पुण्यात्मे वहिले ।
तेच माझे भजनीं लागले ।
म्हणून लाधले ते माझी ॥ ११ ॥
साई साई नित्य म्हणाल ।
सात समुद्र करीन न्याहाल ।
या बोला विश्वास ठेवाल ।
पावाल कल्याण निश्चयें ॥ १२ ॥

—श्री साईसच्चरित अ. १३



## प्रिय वाचक—

श्रीसाईलीलेचा चालू अंक हा एप्रिल मे-जूनचा अंक आहे. याच्या आधींचा अंक हा जानेवरी-फेब्रुवारी-मार्च या तिमाहीचा अंक होता. तिमाही संपल्या-नंतर येणाऱ्या महिन्याच्या एक तारखेला अंक प्रसिद्ध होतो. यामुळें गेल्या वर्षी आम्ही त्या महिन्याचें नांव अंकाच्या मुखपृष्ठावर घालण्याचा उपक्रम सुरू केला होता. पण यामुळें आमच्या कांहीं वर्गणी-दारांचा घोंटाळा होतो असें आढळून आलें आहे! आक्टोंबर-नोव्हेंबर-डिसें-बरच्या अंकाच्या मुखपृष्ठावर 'जानेवारी १९५७' असें लिहिल्यामुळें कांहीं वर्गणीदारांचीं आम्हांला पत्रें आलीं कीं, 'आम्हांला जानेवारीचा अंक मिळाला पण आधींचा डिसेंबरचा अंक कोठें आहे!' हा घोंटाळा टाळावा म्हणून चालू अंकापासून आम्ही पूर्वींची प्रथा चालू केली आहे. ज्या तिमाहीचा अंक अंक असेल त्या तीन महिन्यांचीं नांवें अंकाच्या मुखपृष्ठावर देण्यांत येतील; म्हणजे वाचकांचा गैरसमज होणार नाहीं.

### वाचकांना आवाहन

चालू अंकापासून एक मनोवेधक सत्य-कथा-माला आम्ही सुरू करीत आहोंत. संतांचीं चरित्रें वाचतांना पुष्कळदां कल्पितापेक्षांहि अद्भुत असे प्रसंग त्यांच्या जीवनांत घडलेले आढळून येतात. अशा प्रसंगांच्या सत्य-कथा देण्याचें आम्ही योजलें आहे. या अंकांत, श्रीदासगणू महाराज हे नोकरींत असतांना एका क्रूर भिल्ल दरोडेखोराचा शोध लावण्याच्या कामीं त्यांच्यावर कोणकोणते प्रसंग आले, याचें एखाद्या कादंबरीपेक्षांहि सुरस वर्णन आम्ही देत आहोंत.

तत्त्वज्ञानाच्या केवळ शुष्क चर्चेपेक्षां, गोष्टी सांगत सांगत आपल्या जीवनांतील अनेक प्रश्नांना उत्तरें देण्याच्या पद्धतीचा साईलीलेंत अवलंब केलेला आहे, असें वाचकांना आढळून येईल. साधुसंतांच्या आणि देवादिकांच्या गोष्टी, उद्बोधक आख्यायिका, संस्मरणीय वचनें, बोधपर सुलभ लेख, इत्यादींनीं साईलीलेचा प्रत्येक अंक हा वाचनीय, मननीय व संग्राह्य असा व्हावा यासाठीं आम्ही आमच्याकडून सतत कसोशी करीत आहोंत. गेल्या कांहीं वर्षांत ठराविक तारखेला वाचकांच्या हातीं अंक पडेल अशी दक्षताहि आम्ही घेतलेली आहे. अंक अधिकाधिक आकर्षक आणि अधिकाधिक संग्राह्य करण्याची आमची मनीषा आहे. यासाठीं वाचकांचें साहाय्य आम्हांला हवें आहे. सध्यां साईलीलेचे जे वर्गणीदार आहेत त्यांनीं प्रत्येकानें एक आणखी वर्गणीदार साईलीलेला मिळवून द्यावा अशी आमची कळकळीची विनंती आहे. हें त्रैमासिक शिरडीच्या साईबाबा संस्थानच्या वतीनें निघतें. त्रैमासिकासाठीं संस्थानकडून ठराविक आर्थिक साहाय्यहि होतें. परंतु हें त्रैमासिक आहे याच किंमतींत अधिक

पृष्ठांचें आणि भरगच्च मजकुराचें असें द्यावें अशी आमची तळमळ आहे. हें त्रैमासिक खर्चाच्या दृष्टीनें आपल्या पायांवर उभें राहूं शकलें तर आमची ही इच्छा पुरी करतां येईल आणि वाचकांची अधिक सेवा आमच्या हातून घडेल. यासाठीं आम्ही वाचकांना हें आवाहन करीत आहोंत. प्रत्येक वर्गणीदारानें आपल्या आप्तमित्रांना सांगून किमान एक वर्गणीदार मिळवून द्यावा. आमच्या या विनंतीचा अव्हेर होणार नाहीं अशी आम्हांला खात्री आहे.

## शिरडी क्षेत्रांतील व्यवस्थेबाबत—

शिरडी क्षेत्राचें माहात्म्य प्रतिदिन वाढत असल्यामुळें लोकांचें शिरडी-बद्दलचें कुतूहल वाढावें आणि शिरडी-संबंधीं विविध दृष्टिकोणांतून विविध लोकांनीं बोलावें व लिहावें हें हें स्वाभाविकच आहे. नव्या लोकसभेच्या गेल्या अधिवेशनांत तर एका खासदाराच्या शपथविधीच्या वेळीं त्यानें “ ईश्वर आणि सद्गुरु श्रीसाईबाबा यांना स्मरून ” अशी शपथ घेतल्यामुळें एक दिवस भारतांत साईबाबांचें नांव सर्वतोमुखी झालें. अशा परिस्थितींत शिरडीकडे अधिकाधिक लोकांचें लक्ष वेधावें आणि तेथील वातावरणाबद्दल अधिकाधिक चर्चा व्हावी हें युक्तच आहे.

या चर्चेंत प्रशंसे बरोबर टीकेचे उद्गारही निघतात. शिरडीला येणाऱ्या भक्तांची व्यवस्था नीट व्हावी आणि बाबांचें पूजन त्यांना निर्वेधपणें घेतां यावें यासाठीं येथें अनेक सोयी संस्थाननें केल्या आहेत. या सोयी सर्वांगपरिपूर्ण आहेतच असें कोणी म्हणत नाहीं सुधारणेला पुष्कळ वाव आहे असेंच व्यवस्थापक मंडळ मानतें. पण पुष्कळदां सोयी याच गैरसोयी आहेत अशी टीका केली जाते हें पाहून सखेद आश्चर्य वाटतें.

नमुन्यादाखल आज एकाच गोष्टीचा उल्लेख करतों. शिरडीला येणाऱ्या अनेक भक्तांना समाधिस्थळीं एकादशणी लघुरुद्र महारुद्र, वगैरे पूजाविधी करण्याची इच्छा असते. अशा भक्तांची संख्या कधीं कधीं एकाच दिवशीं पन्नास शंभरहि असते. आतां या बाबतींत कांहींच नियम लावून दिला नाहीं, कसलीच शिस्त ठेवली नाहीं, तर काय होईल? मंदिरांत पूजोत्सुक भक्तांची गर्दी होईल. प्रत्येकाला आपण पूजा प्रथम आटोपावी असें स्वाभाविक वाटत असतें. या इच्छेमुळें पूजास्थानीं सर्वांचीच झुंबड उडेल आणि कोणालाच शांत व स्वस्थ चित्तानें पूजा करतां येणार नाहीं. या गर्दींत एखादा भक्त सकाळीं सहा वाजतां मंदिरांत येऊनहि त्याला बारा वाजेपर्यंत ताटकळत गर्दी ओसरण्याची वाट पाहावी लागेल, तर एखादा तामसी भक्त सर्वांत मागाहून येऊन सर्वांच्या आधीं पूजा करण्याची संधी साधून घेईल. असें घडूं नये आणि सर्वांची वाजवी सोय व्हावी म्हणून संस्थाननें एक नियम केला आहे. तो असा कीं समजा कोणाला लघुरुद्र करायचा असेल तर त्यानें संस्थानच्या कचेरींत या विधीला ठरविलेले पैसे भरावे, पावती घ्यावी व मंदिरांत जाऊन रांगेंत बसावें. त्याची पाळी येईल तेव्हां तो भक्त पावती दाखवितो आणि सर्व

पूजाकर्म यथासांग करतो. कचेरींत भरलेल्या पैशाखेरीज त्याला दक्षिणा वगैरेसाठीं ब्राह्मणांना निराळे पैसे द्यावे लागत नाहींत. पूजा करण्याची सर्वांची इच्छा या पद्धतीनें कसलीहि घाई गडबड न होतां आणि गोंधळ न माजतां स्वस्थपणें पुरी होते.

पण भक्तांना निर्वेध मनानें पूजा करतां या वी आणि त्यांच्याकडून गैरवाजवी पैसा उकळला जाऊं नये यासाठीं केलेल्या या व्यवस्थेचाच विपर्यास कांहीं लोक करतात आणि संस्थानवर व्यापार-बाजीचा आरोप करतात ! सोयीसाठीं निर्माण केलेली शिस्त हीच कांहींतरी वाईट गोष्ट आहे असें हे लोक म्हणूं लागतात !

चांगल्या गोष्टींचाहि विपर्यास कसा होतो याचा नमुना म्हणून हें उदाहरण सांगितलें. शिरडींतील व्यवस्थेबद्दल भक्तांच्या ज्या तक्रारी असतात त्या दूर करण्याचा अविरत प्रयत्न व्यवस्थापक मंडळाकडून चालू असतो. पण भक्तांनींहि तेथील व्यवस्था-खात्याशीं सहकार्य करणें अगत्याचें आहे. बाबांच्या दर्शनासाठीं आलेला प्रत्येक माणूस तेथून परत जायला निघतांना अंतःकरणांत शांतता व समाधान प्राप्त करून निघावा हीच संस्थानची इच्छा आहे. परस्पर समजूत व सहकार्य यांनींच हें घडणें शक्य आहे. असो.

## वाङ्मयप्रभु त्रिलोकेकर यांचें शोचनीय निधन

ज्ञानेश्वरीचे एक गाढे व्यासंगी, जुन्या पिढींतील एक नामवंत कवि आणि टीकाकार, साईलीलेचे विद्वान् लेखक वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर यांचें थोड्याशा आजारानंतर गेल्या मे महिन्यांत देहावसान झालें, हें कळविण्यास आम्हांला अतिशय दुःख होतें. चिकित्सकता आणि श्रद्धा, कवित्व आणि विद्वत्व यांचा मनोहर संगम कै. त्रिलोकेकर यांच्यामध्यें झालेला होता. संतवाङ्मयाचा आणि तत्त्वज्ञानाचा गाढ व्यासंग असूनहि विद्वत्तेचा अहंकार त्यांच्यामध्यें नव्हता. बाबांवर त्यांची भक्ति होती आणि साईलीलेवर त्यांचें निःसीम प्रेम होतें. त्यांच्या निधनामुळें महाराष्ट्र एका व्यासंगी विद्वानाला अंतरला आहे आणि आमचा एक प्रेमळ स्नेही व मार्गदर्शक नाहींसा झाला आहे. त्यांच्या निधनामुळें त्यांच्या असंख्य आप्तमित्रांना झालेल्या अनिवार दुःखांत आम्हीहि सहभागी आहोंत.

—संपादक




डॉ. रुस्तुमजी हे पारशी समाजांतील आहेत. ते शिर्डी संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यांत डॉक्टर आहेत. श्री. बाबा आपल्या सद्भक्तांस आपणांकडे कसे ओढून आणीत आहेत ह्याचा बोध डॉ. रुस्तुमजींच्या मुलाखतीवरून होत आहे. डॉ. रुस्तमजी १९३० मध्यें मुंबईत डबल न्यूमोनियानें आजारी पडले त्यामुळें त्यांना ॲम्ब्युलन्समधून पार्शी जनरल हॉस्पीटलमध्यें नेण्यांत आलें. त्यांची स्थिति कठीण असल्यानें त्यांना गॅसवर ठेवलें होतें. सुप्रासिद्ध डॉ. बिलीमोरिया व डॉ. गिल्डर यांचे उपचार सुरू होते. अशा त्या उभयतांनीं सर्व आशा सोडली होती. डॉ. रुस्तुमजी बेशुद्ध पडून होते. अशा स्थितींत श्री. साई महाराजांनीं त्यांना दृष्टांत दिला. पलंगाजवळ जाऊन विचारलें, "हमको पहचानता है!" डॉक्टरांनीं मानेनेंच नाहीं म्हणून सांगितलें. तेव्हां फिरून सांगितलें, "पहले अच्छे हो जाओ. फिर पीछेसे पहचानोंगे." इतकें बोलून डॉक्टरांच्या पलंगास फेरी घालून ते अदृश्य झाले. दृष्टांतानंतर डॉ. रस्तुमजी एकदम शुद्धीवर आले. हें पाहून हाऊस सर्जन डॉ. दारूवाला यांना आश्चर्य वाटलें. त्यांनीं फोन करून डॉ. गिल्डरना बोलावलें. डॉ. गिल्डरनीं एकवार प्रकृती पाहून सांगितलें, "आणखी चारपांच तासांनंतर निश्चित काय तें समजेल." ज्याच्यावर समर्थांची प्रत्यक्ष कृपा झाली, त्याच्या संबंधानें डॉक्टर काय सांगणार? सायंकाळीं डॉ. गिल्डर व डॉ. बिलिमोरिया यांनीं तपासलें तेव्हां त्यांना महान आश्चर्य वाटलें. कारण त्यांनीं सर्व आशा सोडलेली होती. डॉ. रुस्तुमजी लौकरच बरे होऊन आपल्या घरीं आले.

पण त्यांना स्वप्नदर्शन दिलेल्या त्या महात्म्याचा सारखा ध्यास लागला. अशा स्थितींत सहा महिने गेल्यावर श्री बाबांनीं त्यांच्यावर फिरून कृपा केली. डॉ. रुस्तमजींना बसमध्यें शेजारच्या गृहस्थांच्या हातांत श्रीसाईमहाराजांचें इंग्रजी चरित्र दिसलें. पुस्तकावरील फोटो पाहतांच ह्याच तो महात्मा अशी त्यांची खात्री पटली. त्यांनीं तें पुस्तक हातांत घेऊन पाहिलें व लगेच श्रीसाईबाबांचा फोटो व चरित्र मागवून घेतलें. त्या फोटोची अत्यंत भक्तिभावानें पूजा करूं लागले. आपल्याला पुनर्जन्म देणाऱ्या महात्म्याच्या सेवेंत उर्वरित आयुष्य घालवावें असें त्यांचें मन त्यांस ग्वाही देऊं लागलें. सन १९४९ पर्यंत ते शिरडीस आले नव्हते पण रात्रंदिवस बाबांचाच ध्यास! शिर्डीस आल्यावर त्यांनीं सर्व आयुष्य बाबांच्या सेवेंत वेंचण्याचा निर्धार केला. श्रीबाबा भक्ताच्या सदिच्छेस

नेहमीं साह्य करतात. त्याप्रमाणें संस्थाननें शिर्डी येथें धर्मार्थ दवाखाना काढला. तेव्हां त्याची सर्व जबाबदारी डॉ. रुस्तुमजींनीं स्वेच्छेनें उचलली. दवाखान्यांत सर्व आधुनिक साधनें व उपकरणें आहेत. शहरांत मोठमोठ्या दवाखान्यांतूनही बरे न झालेलें रोगी ह्या दवाखान्यांतून बरे होऊन गेले. त्याचें कारण म्हणजे श्रीबाबांची कृपा व डॉ. रुस्तुमजींची धार्मिक भावनेची सेवा !

## असाध्य आजार बरा झाला !

डॉ. रुस्तुमजींच्या धर्मपत्नीवर धार्मिक संस्कार आहेत. खेरीज एका आश्चर्यकारक घटनेनें ते अधिक प्रबळ झाले. सौ. रुस्तुमजींना डोळ्यांचा आजार झाला. मुंबईतील डोळ्यांचे तज्ञ यांनीं सांगितलें कीं दृष्टी अधू होत जाऊन एका वर्षांत पूर्ण अंधत्व येईल ! डॉ. रुस्तुमजी स्वतः जरी डॉक्टर असले तरी त्यांची औषधांपेक्षां श्रीसाईबाबांच्या सामर्थ्यावरच विशेष श्रद्धा आहे. नोव्हेम्बर १९४९ मध्यें बाईंना हातास धरून शिरडीस आणण्यांत आलें. बाईनें समाधि मंदिरांत जाऊन बाबांची अंतःकरणपूर्वक प्रार्थना करून नवस केला कीं 'माझे डोळे बरे झाल्यास मी तुझ्या पालखीसाठीं स्वतः विणलेली शाल अर्पण करीन !' बाबांची कृपा झाली. तज्ज्ञ डॉक्टराच्या म्हणण्याच्या अगदीं उलट होऊन एका वर्षांत बाईची दृष्टी पूर्ण सुधारली. सौ. रुस्तुमजींनीं स्वहस्तें शाल विणून पालखीसाठीं अर्पण केली. ज्या डोळ्यांना शाल दिसणें—हीं अशक्य होतें त्यांच्याच आधारावर बाईंनीं उत्कृष्ट शाल विणली.

मुंबई येथें सर्वश्रेष्ठ डोळ्यांच्या तज्ज्ञाला सौ. रुस्तुमजींची केस दाखवली. त्यांनीं अत्यंत काळजीपूर्वक तपासणी करून सांगितलें कीं ही केस व्हिएन्नामध्येंहि असाध्य गणली गेली असती ! अशी केस शिरडीस दुरुस्त व्हावी हें बाबांचेंच सामर्थ्य !

## तळमळीच्या प्रार्थनेचें फळ

श्रीबाबांच्या समाधि काला नंतर सुमारें बारा वर्षांनीं कै. तात्याजी कोते पाटिल दम्याच्या विकारानें आजारी पडले ताज्या अंजिराच्या रसांतून औषध दिल्याखेरीज गुण येणें अशक्य, असें वैद्यांनीं सांगितलें. तो अंजिरांचा हंगाम नव्हता सुक्या अंजिराचा उपयोग होणार नाहीं असें वैद्यांनीं सांगितलें होतें. श्री. बाबाजी गुरव यांचे तात्याजी पाटलांवर वडिलांसमान प्रेम ! समाधि मंदिरांत जाऊन त्यांनीं श्रीबाबाची कळवळ्यानें प्रार्थना केली, "देवा, केवळ तात्या पाटलास जीवदान मिळावें म्हणून तूं आपलें देह विसर्जन केलेंस. ह्यावेळींही तूंच त्यांना यातनामुक्त केलें पाहिजेस !" श्री. गुरव संस्थानचे खजीनदार आहेत. ते काकड आरतीस नियमानें हजर असतात. त्याप्रमाणें मंदिरांत गेले असतां पुजाऱ्यानें त्यांना आश्चर्ययुक्त आवाजानें हांक मारून समाधीवरील चमत्कार दाखवला. तेथें डजनभर अगदीं ताजे अंजिर होते ! अगदीं नुकतेच झाडावरून तोडून आणल्यासारखे !! श्री. गुरव आश्चर्यानें थक्क झाले. त्या अंजिरांच्या उपचारानें तात्या पाटील रोगमुक्त झाले.

(श्री. पां. बा. कवडे यांनीं लिहिलेल्या श्रीसाईमहाराजांच्या चरित्रावरून)

# ••• शिरडींतील वैशिष्ट्यपूर्ण •••
# ••• रामनवमी–महोत्सव •••

लेखक–**एक साईभक्त**

श्रीक्षेत्र शिरडी येथें श्रीमत्परब्रह्म सद्‌गुरु साईनाथ महाराज यांच्या समाधिमंदिरांत श्रीसद्‌गुरु साईनाथांनीं आरंभिलेला परंपरागत चालू असणारा श्रीरामनवमी महोत्सव सोहळा अपूर्व होता. श्रीसाईबाबांचे ध्यानयोगानें पवित्र झालेल्या या क्षेत्रांत बाबांचे समाधिनंतर अव्याहतपणें हा उत्सव अखंडपणें वाढत्या वैभवाने चाललेला आहे.

शिरडी माझें पंढरपूर श्रीसाईबाबा-रमावर, हा संत श्रेष्ठ दासगणूमहाराजांचा अनुभव लक्षावधि भोळ्या भाविकांना या उत्सव सोहळ्यामध्यें सहज अनुभवितां आला. श्रीबाबांची समाधि, ब्रह्मपीठच तें! या स्थानांत येणारा साधक भक्त या समाधि ब्रह्मसान्निध येतांच ‘ब्रह्मानंदी लागली टाळी आतां कोण देहा तें सांभाळी’ हा अनुभव येतो. बाबांचे समाधिस्थान म्हणजे हजारों भक्तांचें स्फूर्तिस्थान. या समाधिस्थानीं बाबा आपल्या भक्तांवर अमृतदृष्टीनें कृपाकटाक्षांचा–ब्रह्मचैतन्याचा साक्षात्कार अखंडपणे देत आहेत. पंढरपूर, आळंदी, गाणगापूर, नरसोबावाडी या क्षेत्रांत मिळणारा साक्षात्कारी अनुभव, त्र्यंबकेश्वर काशी विश्वेश्वर रामेश्वर या ठिकाणीं अनुभवितां येणारा पूजासोहळा–उपासनाक्रम यांतील आनंद तसेंच गिरिकंदरांत पूज्य अशा तपोवनांतून प्रतीत होणारा अननभूत आनंद–या सर्वांचा एकसमयावच्छेदें मिळणारा अखंड–आनंद या ठिकाणीं एकत्र एकदम अनुभवितां येतो. ‘असो नसो भाव आलों तुझिया पाया कृपा दृष्टी पाहे मजकडे श्रीपंढरि साईराया’ ही अनुभूति अनंत भक्तांना अनुभवितां येते. शिरडींत काय आहे हें प्रत्यक्ष अनुभविल्यानंतर न बोलतांच आनंदमय आनंदांत प्रत्ययास येतें. ‘वेद-जणू गेला पुढें मौनावला–तें गुह्य तुजला प्राप्त कैसें! यांतील प्रश्नाप्रमाणें ‘पूर्व सुकृताचा पूर्ण अभ्यासाचा दास सद्‌गुरूचा तोचि जाणे। सद्‌गुरुचा दास होऊन त्यांच्याचरणी अनन्यभावें शरणागति स्वीकारल्यानंतर शिरडींतील अनुभव अनुभवितां येतो.

लहान मोठे, विद्वान, शिक्षित, सुधारक, सनातनी, बुद्धिवादी, तत्ववादी, सुसंस्कृत नागरिकांपासून तो खेड्यांतील शेतकरी ग्रामीण जीवनापर्यंत विविध थरांतलि अनेक प्रकारचे अनेक भाषा, संप्रदाय, जाती, धर्म, उपासना पद्धती यांत गढलेले अशा विविधभक्तांची श्रीसाईबाबांवरील एकनिष्ठ अशी सामुदायिक भक्ति पाहिली म्हणजे मानवांचा–आतां विश्वात्मकें देवें–

या विश्वात्मक ब्रह्मस्थितिचा अनुभव येतो. आपआपला सर्व अहंकार–अहंभाव दुजाभाव-भेदभाव हा भावाभावांतील दूरावलंबी भाव विसरून–श्रीसाईनाथ हा एकच भाव ध्यांनीं घेऊन 'यारे यारे भलते नारी नर–स्त्री शूद्रादि आघवे या सर्वांचें भक्तिभावाचें मीलन या शिरडीक्षेत्रांत होते. एक भाव, एक ठाव,–हा अनुभव येथें येतो. बाबांचा प्रसाद सर्व आबालवृद्ध सर्व पंथ जाती–भाषांचे लोक एकाच पद्धतीनें एक ठिकाणी 'सहनाववतु सहनौभुनक्तु या पद्धतीनें मोठ्या प्रेमाने सेवन करीत असतात. अन्य क्षेत्रांत शिरडीचे पद्धती प्रमाणें अद्ययावत् सामूहिक व सार्वजनिक राष्ट्रीय अशा तऱ्हेचे भक्ति-भावाचें प्रत्यक्ष अधिष्ठान नाहीं. शिरडीचे वैशिष्ट्य हें आहे. हें खरे भारतीय क्षेत्र आहे. ब्राह्मणापासून तो अनंत जाती जमातींतील लहान मोठे सुशिक्षितांपासून तो सामान्यांपर्यंत पार्शी, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादि विविध धर्मांचे लोक–भारतीय संस्कृतीचें ब्राह्मविद्येचें अधिष्ठान पुढें ठेवून–इये मऱ्हाठिचिये नगरी–ब्रह्मविद्येचा सुकाळु करी। घेणे देणे सुखचिवरी हो देई—ही अनुभूति अनुभवितांना आनंदित होत होते. शिरडीच्या या सोहळ्यांत भारतीय एकता आध्यात्मिक भक्तिभाव आणि विश्वबंधुत्वाचा अनुभव एकसमयावच्छेदें प्रतीत होत होता.

शुक्रवारपासूनच शिरडी क्षेत्रांत उत्सवाचे वातावरण दरवळूं लागले. हजारो भक्त भाविक झुंडीवर झुंडीनें येत होते. शिरडी संस्थानचे विश्वस्थ समितीचे वतीनें येणाऱ्या भक्तजनांच्या आसऱ्याकरितां–सुंदर निवासस्थानें आहेत. विद्युद्दीपांची सोय, अद्ययावत शौच गृहे, स्नानगृहे, निवास भोजनादि व्यवस्था अद्ययावत आहे. येणारा साधक जणुं आपल्या मायमाहेरघरींच आलेला आहे. त्याच्या सर्व सुखसोयींची मायमाऊलीच्या कळवळ्यानें–प्रेमानें यथासंभव–व्यवस्था संस्थानचे कार्यकर्ते करीत असतात. पूजा उपासना पद्धति ठरवलेली असल्यामुळें या पद्धतीप्रमाणें कुणालाही बाबांची पूजा अभिषेक पारायण इत्यादिकांपैकीं झेपणारा व आवडणारा कार्यक्रम करतां येतो. कीर्तन, प्रवचन, भजन इत्यादि कार्यक्रम चालूच असतात. पहाटे पांच वाजतां काकड आरतीचे दृश्य, दहा वाजतां पूजा दुपारी १२ वाजतां आरति संध्याकाळीं सात वाजतां आरती आणि रात्रीं शेजारती हे कार्यक्रम हृदयंगम व हृदयस्पर्शी असतात.

हा सोहळा वैकुंठीं नाहीं, हा संतांचा अनुभव येथें येतो. या उत्सवांत पुण्याचे श्री. अनंतराव आठवले, श्रीसंत दासगणू महाराज यांच्या परंपरेंतील कीर्तनकार यांची कीर्तनें झालीं. बाबांचे परमभक्त मुंबईचे प्रसिद्ध पंडित पद्मनाभशास्त्री पालये यांचीं बाबांचें कार्य यावर प्रवचनें झालीं. अनेक कलावंत भजनी यांचीं प्रेमळ संगीत भजनें झालीं. मद्भक्ताः यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि ' हें भगवंताचें सांगणें आणि वागणें येथें प्रतीत होत होतें. रामनवमीचे दिवशींचा सोहळा तर वेगळाच होता. आदल्या रात्रीं अखंडपणें भजने चालूच होतीं. मोठ्या पहांटेपासून स्नाने करून पहांटेस ४।। वाजतांच हजारो भक्त–स्त्रीपुरुष भक्तिभावानें काकड आरतीसाठीं उभे

होते. पूजा अभिषेकासाठीं बसच्या क्यू-प्रमाणें हजारो स्त्रीपुरुष रांगेत उभे होते. आपली निष्ठा, भक्तिप्रेम, सौजन्य, सेवा, सहकार्य, यांनीं ते हळुहळूं आपला नंबर मिळवून पूजा अभिषेक करीत होते. शिरडीच्या पूजा अभिषेकाचें दृश्य व अनुभव प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्यांतील आनंद उपभोगतां येणार नाहीं. दर्शना-साठीं रीघ अखंड चालूंच होती. दुपारचें कीर्तन–कीर्तनकार भक्तिभावांत रंगलेले आणि सद्‌गुरु कृपेनें ब्रह्मानंद उपभोगिलेले संत दासगणू महाराजांचे नम्र शिष्य श्री. अनंतराव आठवले–ज्यांनीं सद्‌गुरुला आठवलें परमेश्वराला हृदयसंपुटी सद्‌गुरु-स्वरूपांत साठवलें त्यांनीं श्रीसाईनाथांचें भक्ति प्रेमानंदानें भक्तांना कीर्तनानंदांत देहभाव विसरून एकरूप केलें. हजारों स्त्रीपुरुष भक्तिप्रेमानंदांत तल्लीन झाले होते.

कीर्तन हें लोक शिक्षणाचें सांस्कृतिक निष्ठेचें लक्षण आहे. सामुदायिक आणि वैयक्तिक वर्तन आचरण कसें असावें परमेश्वराला श्रीसद्‌गुरू स्वरूपांत कसें ओळखावें कसें शरण जावें याचे रसाळ अनुभवाचे बोल बुवांचे मुखांतून श्रीसाई-नाथ वदवीत होते. ‘बोलविता धनी वेग-ळाची’ याच श्रद्धेने बुवांचे कीर्तन चालू होतें. श्री. आठवले हे धंदेवाईक कीर्तन-कार नाहीत. आपला व्यवसाय संभाळून ईश्वर सेवा करण्याची आवड असल्यामुळें भक्तिप्रेमाने कीर्तन करितात. श्रीसंत कवि दासगणू महाराजांचें चरित्र त्यांनी लिहिलेलें आहे. सुदृढ तरुण, सुविद्य, सुशील शास्त्रज्ञ नागरिक व समाजसेवक हरिदास असा सर्वांग सुंदर समन्वय बुवांचे व्यक्तित्वांत एकरूप झालेला आहे. वक्ते, लेखक, अभ्यासू, सद्‌गुरूचा दास, अनन्य भक्त आणि निरहंकारनिरभिमानी विद्वान या दृष्टीने श्री. आठवले यांचे व्यक्तिमत्व अविस्मरणीय आहे. महाराष्ट्रीय परंपरेंतील हा भव्य साक्षात्कारच आहे. शिरडी संस्थानचे विश्वस्थ–कार्यकर्ते यामध्यें सर्व व्यवसाय दर्जाचे–श्रीमानापासून विद्वानां पर्यंत सर्व प्रकारचे लोक आहेत. या सवाचें वैशिष्ट्य–हे सर्वजण निरभिमान वृत्तीने सेवा करीत असतात. उच्च पदवीधर, व्यापारी, पंडित, शास्त्री, तसेंच इंजिनीअर वकील डॉक्टर वृतपत्र व्यवसायी इत्यादि पेशाचे व्यवसायाचे लोक स्वयंसेवक होऊन काम करीत असतात, राष्ट्रीयत्वाचा परिपोष भारतीय अध्यात्मिक असें उच्च मानवी मूल्य जनमनांत दृढ करीत असतात हेंही शिरडीचे वैशिष्ट्य आहे.

भारताची परंपरा ही अध्यात्माची विश्वबंधुत्वसहिष्णु सत्प्रवृत्त सुसंस्कारांची आहे. ‘न घडो कोण्याही जिवाचा मत्सर’ हें भारतीय अध्यात्म संस्कृतीचें लक्षण आहे. शिरडीमध्यें हें लक्षण अनुभवा। येते. भारतीय तीर्थक्षेत्रांत शिरडीचें हें वैशिष्ट्य निर्माण झाल्यास भारताचें भारतीयत्व हें मानवतेचें वैशिष्ट्य म्हणून जगद्‌वंद्य होईल.

श्रीसाईनाथ महाराजांची समाधि सन १९१८ मध्यें झाली त्यानंतर गेली ३९ वर्षं हा सोहळा उत्सव अखंडपणे चालू आहे. बाबांचे चरित्र म्हणजे संतचरित्र. संतांचे संतपण त्यांच्या सन्निध येऊन त्यांची सेवा संगति केल्या शिवाय समजत नाहीं. संत संग देगा सदा हें मागणे आणि त्याप्रमाणें वागणे हें महाराष्ट्रीयांचें राष्ट्रीयत्व आहे. महाराष्ट्र संतांनी निर्मिलेला

राखलेला, वाढवलेला पुरस्कारिलेला आणि जगद्विकासांत प्रभावी केलेला महान् प्रांत आहे. भेदभाव रहित ऐक्य हें महाराष्ट्राचें ब्रीद–यासाठीं महाराष्ट्रांतील तीर्थ क्षेत्रांत संतांनीं अखंड ध्येय-दीप—ध्यान ध्येय ध्याता–ही त्रिपुटी जागृत ठेवलेली आहे. महाराष्ट्र हा देहू आळंदी पंढरपूर शिरडी येथील वातावरणांत आहे. 'इये मऱ्हाठीचिये नगरी–ब्रह्मविद्येचा सुकाळु करी घेणे देणे सुखचि वरी–ही संतशिरोमणी ज्ञानेश्वर महाराजांची प्रचीति शिरडी या महाराष्ट्रीय क्षेत्रांत पूर्णत्वानें येते.

श्रीसाईनाथमहाराज हे नाथ संप्रदायांतील महान् योगी. श्रीज्ञानेश्वर माऊली ज्या नाथ संप्रदायांतून प्रकटली त्याच ज्ञानगंगेतून श्रीसाईनाथ प्रकटले. ज्ञानदेवें रचिला पाया–तुका झालासे कळस हीं संतकृपेनें घडलेली महाराष्ट्र संतसंस्कृतीची इमारत साईनाथांनी आपल्या दिव्य धुनीनें, उदीनें राम उपासनेनें आणि अखंडपणें सर्व धर्मांच्या भाविक भक्तांना वावरण्यासाठीं–आपला संसार सुखाचा करून घेण्यासाठीं सर्वांसाठीं खुली केली मोकळी दिली. परमेश्वराची भक्ती हेंच मुख्यसाधन धर्म हें बंधन नसून तें लक्षण आहे. कर्तव्याचें रक्षण करण्याचें साधन आहे. परमेश्वर सर्व प्राणीमात्रांचे ठिकाणी सर्वांतर्यामी सारखाच आहे. सर्वभूती भगवंत पहाणे आणि त्याप्रमाणें नित्य नैमित्तिक व्यवहारांत वागणे हीच श्रीसाईनाथांची शिकवण. सन १९१८ साली त्यांची समाधि झाली. तत्पूर्वी किमान साठ वर्षे त्यांचें वास्तव्य शिरडी क्षेत्रांत झाले. सन १८५७ नंतरचा हा काळ–याच काळांत भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीचें समुद्रमंथन चालू होतें. या समुद्रमंथनातून लोकमान्यांसारखे महान राष्ट्र धुरीण प्रकटले. श्रीसाईनाथ हे या विचारमंथनाची मंथा होत. शिरडीच्या या क्षेत्रांत या महान पुरुषानें राष्ट्रीयत्वाची भारतीय आध्यात्मिक संस्कृतीची उपासना आणि जोपासना आत्यंतिकतेनें करून सर्व प्रकारच्या लोकांना सत्यधर्माचें संतांच्या शिकवणुकीचें रहस्य उलगडून आचारणांत आणून दाखविलें. धर्म नीतीचा ऐकुनि व्यवहार निवडिलें सार असारतें। तुका म्हणे धर्म रक्षावयासाठीं देवासही अटी जन्म घेणें ॥ या संतशिरोमणी तुकाराम महाराजांच्या अभंग वाणी प्रमाणें श्री साईनाथांची रहाणी, वागणी करणी वाणी आणि समाजाच्या मनोभूमिकेची उभारणी होती. साईचरित्राचा राष्ट्रीयत्वाशी मोठा संबंध आहे. रामरायाचा राष्ट्रपुरुषाचा महान् उत्सव साईनाथांनीं याचसाठीं सुरू केलेला आहे.



# संसाराकडून विठ्ठलाकडे—

**दुःखाचा आघात हा चित्तशुद्धीसाठीं ईश्वरानें दिलेला वर-प्रसाद असतो. पण हा प्रसाद ग्रहण करण्यालाहि माणसाच्या मनाची तयारी व्हावी लागते. ही तयारी करण्याइतकी झुंजार वृत्ति ज्याच्यामध्यें आहे त्यालाच संतपण लाभतें. संतश्रेष्ठ श्रीतुकाराम महाराज यांच्या मनाची संसाराकडून विठ्ठलाकडे कशी कशी प्रवृत्ति वळत गेली, याचा अभ्यास अलीकडे अधिकाधिक होऊं लागला आहे. मराठींतील एक व्यासंगी विद्वान् कै. पु. मं. लाड यांनीं तुकाराम महाराजांचें जें चरित्र लिहिलें आहे, त्यांत या अभ्यासाचें चिकित्सक वळण आहे. त्या चरित्रांतील ' सारासार विवेक ' या प्रकरणामधील कांहीं भाग जिज्ञासू वाचकांसाठीं येथें देत आहोंत……**

……तुकारामास सावकारीचा हळू-हळू वीट येऊं लागला होता. व्याजानें संपत्ति संपादन करण्यांत जी आत्महानि होते तिची जाणीव त्याला होत होती. ' ऋण वैर हत्या । हें तों न सुटे नेंदितां ॥ ' हा सावकारीचा निर्घृण नियम माणुसकी जाणतच नाहीं. सुपांतले व जात्यांतले—कालांतरानें तो या सर्वांना सारखेंच भरडून टाकतो. निःसत्त्व रयतेकडून रोख्यांतील लेखाप्रमाणें आपणांस येणें असलेला मांसाचा लचका तोडून घेण्याइतका तुकाराम कसाब शॉयलॉक झाला नव्हता. ' व्याजें कासाविसी बहु केलें ' अशीं गयावया करणारीं कुळें त्याला आतां प्रत्यहीं भेटत होतीं. त्यांच्या दारांत धरणें धरून बसणें, त्यांना माजघरांत कोंडणें, ' भरुनि पालव असुडीन करें ' अशी त्यांची चारचौघांत विटंबना करणें—हे सारे सावकारीचे निष्ठुर पाश आवळणें त्याच्या अंगवळणीं पडेना—खिस्तीच्या उदीमांत आनंद मानणारे ब्राह्मणहि त्याच्या माहितींत होते. त्यांचें ब्रह्मज्ञान त्याजपाशीं नव्हतें; उलट स्वतः कुणबी असल्यामुळें कुणबी कुळांच्या सुख-दुःखांचें त्याला चांगलेंच ज्ञान होतें. या खिस्त्यांचा किळस यावा अशा भाषेंत त्यानें कसा उपहास केला आहे :—

' खिस्तीचा उदीम ब्राह्मण कलियुगीं ।
महारवाडीं मांगीं हिंडतसे ॥ १ ॥
वेवसाव करितां पर्वत मांगासीं ।
ते पैं विटाळासी न मानिती ॥
मांगिणीसी नित्य करीतसे लेखा ।
तोंडावरी थुंका पडतसे ॥ '

' अंगीं ब्रह्मक्रिया खिस्तीचा व्यापार ।
हिंडे घरोघर चांडाळाचे ॥
अंत्यजा खिचडी घेताती मागून ।
गाळिया प्रदान माया बहिणी ॥ '

दुष्काळांत थकलेल्या कुळांकडून वसुली उकळण्यासाठीं हीं सारीं ब्रह्मास्त्रें वापरण्याइतकें त्याचें मन निर्विकार झालें

नव्हतें. व्याज हें पाप आहे—'शमलं कुसीदम्'—हें त्याच्या सभोंवतालच्या इस्लामास सुद्धां पसंत असलेलें उपनिषदाचें तत्त्वज्ञान दुष्काळानें त्याला शिकविलें. म्हणूनच दुष्काळानंतर कर्जरोखे इंद्रायणींत बुडवून हें पाप त्यानें कायमचें धुवून टाकलें.

किंबहुना श्रीमंतींत पापाचा अंश हा असावयाचाच याची त्याला प्रचीति येऊं लागली होती. वजनमापांचें सत्य व्यापारी पाळीत नव्हते व भोळ्याभाबड्या साळ्या कोष्ट्यांना ठकवीत होते हें तो पाहात होता. ठकाठकींतच नफा ठीक होतो. सत्याचा जय होतो खरा, पण संपत्तीच्या चढाओढींत सत्यवानास हमखास विजय मिळत नाहीं, हें नानाविध वैश्यव्यवसाय करून त्याला आतां कळून चुकलें होतें. नफ्याच्या प्रमाणांत पापाची रास वाढते हें व्यवहाराचें त्रिकालाबाधित त्रैराशिक तो शिकत होता. आपल्या भोंवतालच्या प्रतिष्ठित धंद्या—हुद्या विषयीं त्याचा जो ग्रह झाला होता तो त्यानें पुढें आपल्या शिरस्त्याला अनुसरून स्पष्ट शब्दांत मांडला आहे:—

'कांहीं दुसरा विचार।
न लगे करावाचि फार॥
सेट्या ना चौधरी।
पांडेपण वाहे शिरीं॥
पाप न लगे धुंडावें।
पाहिजे तरी तेथें जावें॥
जकातीचा धंदा।
तेथें पाप वसे सदा॥
गाई म्हैसी हेड।
तूप विकी महा द्वाड॥
तुका म्हणे पाहीं।
तेथें पुण्या रीघ नाहीं॥

या पापापासून अलिप्त राहावयाचा प्रयत्न करून त्यानें आपलें हंसें करून घेतलें होतें. कारण सत्यानें पैसा मिळवितां येतो ही कल्पनाच मुळीं व्यापाऱ्यांना हास्यास्पद वाटते. या दृष्टीनें अर्थार्जन हें त्याला अनर्थावह वाटूं लागलें होतें. 'अवघें पाप केलें तेणें। जेणें सोनें अभिलाषिलें॥' हा सिद्धान्त तो अनुभवानें बसवीत होता.

ज्यांच्याकरितां 'दिवसा व्यापार चावटी। रात्रीं कुटुंबचिंता मोटी' करावयाची, 'खाटेवरी पडतां। (ज्यांची) व्यापी चिंता तळमळ॥' तीं सारीं 'पुत्र पत्नी बंधू खाणोरीं' केवळ सुखाचे सोबती आहेत, याची विपरीत काळांत त्याला खात्री पटली. आधींच तो दोन बायकांच्या भांडणांनीं वैतागून गेला होता. या निजसेजेच्या अंतुऱ्यांच्या नाजुक कटकटी मिटविण्यांत त्याचा जीव मेटाकुटीला आला असणार. एका छपराखालीं दोन स्त्रिया म्हणजे भांडणतंटा, हा संकेत चिनी वर्णलिपींत वज्रलेप करून टाकिला आहे! तुकारामानें स्वानुभवानें हा सिद्धांत बांधला कीं, 'एका पुरुषा दोन नारी। पाप वसे त्याचें घरीं॥' दोन बायकांबरोबर या पापाचाहि तो धनी झाला होता. ही दुसरी नवी राणी तरणीताठी आणि मोठ्या श्रीमंताची लेक. तिचा 'धांगडधिंगा' तसाच मोठा. पहिली जुनी सोबतीण; आणि तशांत तिनें पुत्राचा अहेर केलेला. एकीकडे काम ओढी तर दुसरीकडे प्रेम ओढीत होतें. या भेदाभेदांच्या ओढाओढीमुळें 'सेज बाज भोगविलासांत' तरुण दंपतीच्या एकचित्ततेनें त्याचा लय लागेना. नुकसान

येऊन धंदा बसला तेव्हां नव्या व्यवसायांच्या अखंड हव्यासानें पीडिलेल्या जिवाला विलास गोड तरी कसे लागावेत? धनाबरोबर बायकांकडून मिळणारा प्रेमाचा मान आटत चालला होता. स्वतःच्या पोटाला जेव्हां चिमटे घ्यावयाची त्यांना पाळी आली तेव्हां तर त्या त्याला उघड चिमटे घेऊं लागल्याः—

‘ घरीं हळहळ करिती दारा ।
म्हणती संसारा काय करूं ॥
आम्ही उठलों माणसांतून ।
खावयासी अन्न मिळेना ॥
घरीं कांता ऐशा रीतीं ।
नानापरीचे अपशब्द बोलती ।
बाहेर पिशुन सर्व हांसती ॥ ’

अशा वातावरणांत ‘ जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे । ’ हें साऱ्या संसारासंबंधींचें सारतत्त्व त्याला समजूं लागलें.

ज्या मायबापांच्या व दारापुत्रांच्या संगांत माया गुंतवावयाची ते तर नित्य मृत्यूच्या संगतींत असतात, हें लागोपाठ घडलेल्या पांच मृत्यूंनीं त्याला पुरतें कळून चुकलें. मृत्यु–दुःखाचें ‘ आर्यसत्य ’ अशा प्रकारें त्याच्या आयुष्यांत आरंभींच स्थापिलें गेलें. त्यानेंच म्हटल्याप्रमाणें, ‘ जीवा नाहीं कुडीचें लाहातें । ये भिन्न पंच भूतें । रचतें खचतें संचितें । असार रितें फलकट ॥ पुत्र पत्नी सहोदर । मायबाप गोताचा पसर। मिळतां काष्ठें लोटितां पूर। आदळीं दूर होती खळाळीं॥ ’ ह्या अनुभवाचा कडू घुटका त्याला घोळवून घोळवून गिळावा लागला.

गोताचा पसाराच काय, भोंवतालीं दिसतें तें सारेंच फलकट सृष्टीच्या एका निःश्वासानें चटसारें उडून जातें हें त्याला दिसून आलें. राष्ट्रावर आलेल्या असल्या दारुण आपत्तींनीं जगताला अनीश्वर म्हणणारे आसुरी संपत्तीचे वारस सुद्धां क्षणभर गोंधळून जातात. लिस्बन शहराचा एक भाग दिसतां दिसतां खचून जाऊन समुद्रांत लुप्त झाला असतां, युरोपांतील अठराव्या शतकांतील निरीश्वरवादी सुद्धां संदेहांत गटांगळ्या खाऊं लागले. तेव्हां हें जग केवळ ‘ कामहैतुक ’ नसून, मानवाचीं क्षुद्र कळसूत्रीं बाहुलीं खेळविणारा कोणी नियंता असला पाहिजे असें तुकारामसारख्या सामान्य माणसास वाटलें तर आश्चर्य कसलें? एकट्या मानवाचा दुबळेपणा विश्वांतील विश्वंभरांत विलीन होतांच नाहींसा होतो व त्याला देवाचें बळ लाभते ही सिद्धि महाराष्ट्रांतील संतचरित्रांच्या द्वारां त्याच्या ऐकिवांत आली होती. तिच्या शोधाकडे त्याची वृत्ति साहजिकच वळूं लागली.

अशा मनोवृत्तींत तुकाराम सारासार विवेक करूं लागला तर नवल नाहीं. तुकारामाच्या वैराग्याकडे दोन निरनिराळ्या दृष्टींनीं लोक पाहात आले आहेत. कांहींना असें वाटतें कीं, ‘ प्राणी भोगिती त्रिविध नरक। मग पश्चात्तापें करूनि देख। मोक्ष सुख पावती ॥ ’ या संतचरित्रांच्या सिद्धान्ताचें हें आणखी एक उदाहरण आहे. संसार वमन झाला तरी पुनः पुनः संसारचक्र सारखें चालू ठेवणें यांतच कांहींना पुरुषार्थ वाटतो. त्यांच्या मतें तुकारामाचें वैराग्य या संसाराच्या रणांगणांतून पाय मागें घेणाऱ्या भ्याडाचा पळपुटेपणा होय. त्यांना असें वाटतें कीं आपत्तीच्या भरानें तुकाराम वांकला, त्याची दृष्टि विकृत